नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५१ * अंक २४७ * * अकोला * | रविवार, दिनांक २ मार्च २०२५ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)




## ८ मार्चपासून मणिपुरात सामान्य वाहतूक

■ **वृत्तसंस्था, इंफाळ, दि. १ :** गृहमंत्री अमित शहा यांनी शनिवारी मणिपूरमधील परिस्थितीचा आढावा बैठक घेतली. यादरम्यान, शहा यांनी रस्ते अडवणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. गृहमंत्र्यांनी ८ मार्चपासून मणिपूरमधील सर्व रस्त्यांवर विना अडथळा वाहतूक सुनिश्चित करण्याचे निर्देश दिले आहेत.
मे २०२३ पासून सुरू असलेल्या हिंसाचारानंतर, मैतेई आणि कुकी समुदायाच्या लोकांनी आपापल्या भागातील रस्ते रोखले आहेत. त्याचा उद्देश इतर समुदायातील लोकांना त्यांच्या क्षेत्रात येण्यापासून रोखणे आहे. गृहमंत्र्यांनी या प्रकारचे अडथळे संपवण्याचे आदेश दिले. राज्यात राष्ट्रपती राजवट लागू झाल्यानंतर ही पहिलीच आढावा बैठक होती.

## थोडक्यात

### २ नक्षल्यांना कंठस्नान

■ **सुकमा :** छत्तीसगडच्या सुकमा जिल्ह्यात जवानांनी दोन नक्षलवाद्यांना ठार मारले आहे. त्यापैकी एक महिला आणि एक पुरूष नक्षलवादी आहे. दोघांचेही मृतदेह सापडले आहेत, परंतु त्यांची ओळख पटलेली नाही. २०२५ मध्ये ८३ नक्षलवादी मारले गेले आहेत.
शनिवारी सकाळपासून पोलिस आणि वरिष्ठ नक्षलवादी नेत्यांमध्ये चकमक सुरू होती. कोब्रा, डीआरजी आणि जिल्हा दलाच्या सुमारे ५०० सैनिकांनी किस्ताराम परिसरात नक्षलवाद्यांना घेराव घातला. याआधी ९ फेब्रुवारी रोजी सैनिकांनी विजापूरमध्ये ३१ नक्षलवाद्यांना ठार मारले होते. २ फेब्रुवारी रोजी ८ नक्षलवादी मारले गेले.

जानेवारी आणि फेब्रुवारी महिन्यात छत्तीसगड राज्यासह महाराष्ट्राच्या गडचिरोली जिल्ह्यातही अनेक नक्षल्यांना कंठस्नान घालण्यात पोलिसांना यश आले आहे. शिवाय, कित्येक नक्षलवादी आत्मसमर्पण करू लागले आहेत.

### हिमस्खलन : दोघांचा मृत्यू

■ **चमोली :** २८ फेब्रुवारी रोजी उत्तराखंडमधील चमोली येथे हिमस्खलन झाले. बर्फाचा ढिगारा कोसळला आणि ५५ लोक त्याखाली अडकले. काल रात्री ८ वाजेपर्यंत ३३ जणांना वाचवण्यात यश आले. आज १६ लोकांना बाहेर काढण्यात आले. एकूण ४९ लोकांना बाहेर काढण्यात आले आहे. ६ जणांचा शोध सुरू आहे. २ कामगारांच्या मृत्यूची बातमी आहे. याची पुष्टी झालेली नाही.

### कर्नाटकात सर्व उत्पादनांवर कन्नड भाषा अनिवार्य

■ **बंगळुरू :** कर्नाटक सरकारने सरकारी कार्यालये, शैक्षणिक संस्था आणि व्यवसायांमध्ये कन्नड भाषा सक्तीची करण्याचा आदेश जारी केला आहे. या उपक्रमाचा उद्देश प्रशासन, शिक्षण आणि व्यवसायात कन्नड भाषेला प्रोत्साहन देणे आहे. सरकारने १५ फेब्रुवारी २०२५ रोजी या संदर्भात एक परिपत्रक जारी केले होते. सरकारच्या म्हणण्यानुसार, हा निर्णय कन्नड भाषा व्यापक विकास कायद्याअंतर्गत घेण्यात आला आहे. ते २०२२ मध्ये लागू करण्यात आले होते, जे १२ मार्च २०२५ पासून लागू होईल. कन्नड भाषेला प्रोत्साहन देणे आणि स्थानिक लोकांना चांगल्या संधी उपलब्ध करून देणे हे यामागील उद्दिष्ट आहे.

### वाल्मीक मुख्य सूत्रधार

■ **बीड :** वाल्मीक कराड हाच बीडच्या सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याकांडाचा मुख्य सूत्रधार असल्याचा दावा बीड पोलिसांनी आपल्या आरोपपत्रात केला आहे. या आरोपपत्रात वाल्मीकचा उल्लेख आरोपी क्रमांक 1 असा करण्यात आला आहे. यामुळे या हत्या प्रकरणाशी संबंधित खंडणी प्रकरणात अटक करण्यात आलेल्या वाल्मीक कराड भोवतीचा कारवाईचा फास आणखीनच आवळला गेला आहे. खंडणी, अ‍ॅट्रोसिटी, हत्या प्रकरणाचे एकत्रित गुन्हे आहेत. पाच साक्षीदारांच्या गोपनीय जबाबानंतर वाल्मीक कराडविरुद्ध पुरावे मिळालेत.

### तानाजी सावंतांनी मंजूर केलेल्या ३२०० कोटी रुपयांच्या कामांना स्थगिती

# फडणवीसांचा शिंदेंना पुन्हा झटका

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १ :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुन्हा एकदा माजी मुख्यमंत्र्यांना झटका देत आरोग्य विभागातील ३२०० कोटी रुपयांच्या कामांना स्थगिती दिली आहे. या कामांसाठी काढलेल्या टेंडरची रक्कम फुगवण्यात आली असून यात घोटाळा झाल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. त्यामुळे आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा एकनाथ शिंदे यांच्या मंत्राला दिलेला मोठा झटका मानला जात आहे.



फडणवीस यांनी मागील सरकारच्या कार्यकाळात झालेल्या कामांना स्थगिती देण्याचा सपाटा लावला असल्याचे दिसून येत आहे. विशेष म्हणजे यातील अनेक कामे ही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेना पक्षातील सहकारी मंत्र्यांची आहेत.

आरोग्य मंत्रालयाच्या अखत्यारीत असलेल्या सर्व शासकीय रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र आणि उपकेंद्रांची बाह्य यंत्रणेद्वारे तांत्रिक पद्धतीने साफसफाई करण्यासाठी वार्षिक ६३८ कोटी याप्रमाणे पाच वर्षांसाठी सुमारे ३१९० कोटी रुपयांची कामे तानाजी सावंत यांनी पुण्यातील एका खासगी कंपनीला मंजूर केली होती. ३० ऑगस्ट २०२४ रोजी या निर्णयाला मंजुरी देण्यात आली होती. मात्र आता या निर्णयाला स्थगिती देण्यात आली आहे.

या संबंधात करण्यात आलेल्या आरोपांनुसार ज्या कंपनीला तांत्रिक साफ सफाईच्या कामांचा कोणताही अनुभव नाही, तरी देखील त्या कंपनीला राज्यभरातील रुग्णालयांची जबाबदारी देण्यात आली होती.
विशेष म्हणजे या आधी या कामासाठी वर्षाला केवळ ७० कोटी रुपये खर्च येत होता. तो खर्च देखील वाढवण्यात आला होता. आता फडणवीसांनी तानाजी सावंताचे तेंव्हाचे आदेशच रद्द ठरवून झटका दिला आहे.

### ड्रग्सच्याबाबतीत झिरो टॉलरेंस पॉलिसी

# पोलीस सापडल्यास बडतर्फ

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १ :** मुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत आज महाराष्ट्र पोलिस परिषद पार पडली. या परिषदेमध्ये केंद्र सरकारने तयार केलेल्या तीन नवीन कायद्यांची राज्या अंमलबजावणी संदर्भात सादरीकरण झाले. याशिवाय महिलांवरील अत्याचार आणि ड्रग्स संबंधित सुरू असलेल्या कारवाईवरही चर्चा झाली.

पोलिस अधिकाऱ्याचा ड्रग्स प्रकरणाशी संबंध आढळला, तर त्याला थेट बडतर्फ करण्यात येईल, असे धोरण घेण्याचा निर्णय झाल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. तसेच बीड हत्या प्रकरणाची केस फास्ट ट्रॅकवर चालवण्याची आम्ही कोर्टाला विनंती करणार असल्याचेही ते म्हणाले.

महाराष्ट्र पोलिस परिषदेमध्ये सायबर गुन्हे रोखण्यासाठी महाराष्ट्राने जो रोबस्ट महासायबर तयार केलाय, त्यासंदर्भातही सादरीकरण झाले. महिला आणि बालकांवरील अत्याचारांची रोखथाम करण्यासाठी त्याप्रमाणे अशाप्रकारचे गुन्हे उघडकीस आणण्यासाठी आणि आरोपपत्र वेळेत कसे जाईल यासंदर्भातही चर्चा झाली.

यासोबतच ड्रग्स संदर्भात कशाप्रकारची कारवाई चाललेली आहे आणि पुढे कशाप्रकारची कारवाई केली पाहिजे, यासंदभार्तील चर्चा देखील झाली आहे. उद्योगांना कुठल्याच प्रकारचा त्रास होऊ नये, याद्दष्टीने आपल्याला काय करता येईल? यासंदर्भात चर्चा झाली. आपली फॉरेन्सिक कॅपॅबिलीटी आपल्याला कशी वाढवता येईल, याबाबतही एक सादरीकरण करण्यात आल्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

**... तर पोलिस अधिकाऱ्याला बडतर्फ करणार**

ड्रग्सच्या संदर्भात झिरो टॉलरन्स पॉलिसी असणार असल्याचे या परिषदेमध्ये सांगितले आहे. कुठलाही आणि कुठल्याही रँकचा पोलिस ड्रग्सच्या प्रकरणाशी थेट संबंधित सापडला, तर त्याला निलंबित न करता थेट बडतर्फ करण्यात येईल, अशा प्रकारची पॉलिसी घेण्याचा निर्णय घेतला आहे.

एखाद्या गुन्ह्यातील सापडलेली लोकांची जप्त झालेली संपत्ती ती परत करता येईल, अशा प्रकारच्या तरतुदी नवीन कायद्याने तयार केल्या आहेत, असेही त्यांनी सांगितले.

## ट्रम्प आणि झेलेन्स्कीत खडाजंगी



■ **वृत्तसंस्था, वॉशिंग्टन, दि. १ :** शुक्रवारी रात्री उशिरा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांची व्हाइट हाऊसमध्ये भेट झाली. यादरम्यान ट्रम्प, उपाध्यक्ष जेडी व्हेन्स आणि झेलेन्स्की यांच्यात जोरदार वादविवाद झाला.

व्हेन्स यांनी झेलेन्स्कींवर अमेरिकेचा अपमान केल्याचा आरोप केला. त्याच वेळी, ट्रम्प यांनी युक्रेनियन राष्ट्राध्यक्षांना अनेक वेळा फटकारले. ट्रम्प यांनी झेलेन्स्कींवर तिसऱ्या महायुद्धावर जुगार खेळल्याचा आरोप केला. यानंतर, संतप्त झालेले झेलेन्स्की संभाषणातून उठले आणि पटकन त्यांच्या काळ्या एसयूव्हीमधून बाहेर पडले आणि हॉटेलकडे निघून गेले. दोन्ही नेत्यांमध्ये खनिजांबाबत एक करार होणार होता, परंतु ती चर्चा रद्द करण्यात आली.

झेलेन्स्की व्हाइट हाऊसमध्ये पोहोचले तेव्हा ट्रम्प दाराशी आले आणि त्यांचे स्वागत केले. दोघांनीही हस्तांदोलन केले, त्यानंतर ट्रम्पने झेलेन्स्कींकडे बोट दाखवत माध्यमांना सांगितले, 'ते आज चांगली तयारी करून आले आहेत.'

### २०२४ चा महाराष्ट्र भूषण पुरस्कार

# अद्याप घोषित नाही

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १ :** महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र भूषण पुरस्कार २०२४ अद्याप जाहीर केलेला नाही, अशी माहिती माहिती अधिकार कार्यकर्ते अनिल गलगली यांना माहितीच्या अधिकाराखाली मिळाली आहे.
अनिल गलगली यांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे कार्यक्रम अधिकारी नि. ज्ञा. धुमाळ यांनी सांगितले की, २०२३ चा महाराष्ट्र भूषण पुरस्कार २२ फेब्रुवारी २०२४ रोजी प्रदान करण्यात आला होता. तसेच, २०२४ च्या पुरस्कारासाठी २ जानेवारी २०२४ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती, मात्र अद्याप पुरस्कार जाहीर झालेला नाही. १९९७ ते २०२३ या कालावधीत एकूण १९ महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रदान करण्यात आले आहेत. मात्र, २०१३, २०१४, २०१६, २०१७, २०१८, २०१९, २०२० आणि २०२१ या वर्षांत हा पुरस्कार जाहीर करण्यात आला नव्हता.

## फडणवीसांच्या हस्ते आज परिवहन भवनचे भूमिपूजन

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १ :** राज्याच्या परिवहन विभागाच्या मुख्यालयासाठी परिवहन भवन या नव्या इमारतीचे भूमिपूजन २ मार्च रोजी दुपारी २ वाजता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, एकनाथ शिंदे, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक उपस्थित राहणार आहेत.

राज्यातील वाहतूक व्यवस्थेचे नियमन करणारा परिवहन विभाग १ मार्च १९४० रोजी स्थापन झाला. हा दिवस परिवहन दिन म्हणून साजरा केला जातो. याच औचित्य साधून मुंबईतील सर पोचखानवाला मार्ग, वरळी येथे चार मजली प्रशस्त परिवहन भवन इमारतीच्या उभारणीस प्रारंभ केला जाणार आहे. या नव्या इमारतीचे एकूण बांधकाम क्षेत्र १२,८०० चौरस मीटर असून, त्यामध्ये चार मजली भूमिगत पार्किंग सुविधा असेल. येथे एकावेळी १५० चारचाकी वाहने उभी करता येतील. संपूर्ण इमारत अडीच वर्षांत पूर्ण करण्याचा संकल्प आहे.

राज्याला दरवर्षी १५,००० कोटी रुपयांचा महसूल मिळवून देणाऱ्या परिवहन विभागाच्या मुख्यालयाला अद्याप स्वतःची इमारत नव्हती. गेल्या ८५ वर्षांपासून हा विभाग भाड्याच्या इमारतीत कार्यरत होता. परिवहन मंत्री म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर प्रताप सरनाईक यांनी आपल्या पहिल्याच बैठकीत मुख्यालयासाठी स्वतंत्र इमारत उभारण्याचा संकल्प सोडला आणि त्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला. अखेर त्यांच्या प्रयत्नांना यश मिळाले असून, रविवारी भूमिपूजन होणार आहे.

## साठी ओलांडली... विधानसभा लढायची नाय..



■ **वृत्तसंस्था, जालना, दि. १ :** भाजपचे ज्येष्ठ नेते बबनराव लोणीकर यांनी आपल्या वाढदिवसादिवशी मोठी घोषणा केली आहे. परतूर-मंठा विधानसभा मतदारसंघाचे आमदार बबनराव लोणीकर यांनी या घोषणेतून त्यांच्या निवृत्तीचे संकेत दिले आहेत.

माझे वय आता 60 वर्षे झालेले आहे, त्यामुळे मी आता निवृत्तीच्या दिशेने आहे. त्यामुळे यापुढे विधानसभा लढायची नाही, असे बबनराव लोणीकर यांनी म्हटले आहे. मात्र, आपली लोकसभा निवडणूक लढवण्याचीही इच्छा असल्याचेही ते म्हणाले.

वाढदिवशी रिटायरमेंटची भाषा आणि दुसरीकडे लोकसभा लढवण्याची इच्छा जाहीर करणे म्हणजे नेमके बबनराव लोणीकर यांना राजकारणातून निवृत्त व्हायचे आहे की मग लोकसभा लढवून प्रमोशन घ्यायचे आहे, अशी चर्चा राजकीय वतुर्ळात सुरू झाली आहे. लोकसभा निवडणूक लढवण्याची इच्छा व्यक्त केल्यानंतर त्यांच्या समर्थकांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे. आपल्या कार्यकर्त्यांशी संवाद साधताना त्यांनी आपल्या भविष्यातील राजकीय वाटचालीसंदर्भात मोठी घोषणा करीत एकप्रकारे निवृत्तीचे संकेत दिलेत.

## कराडच्या प्रश्नावर संतापल्या पंकजा

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. १ :** मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणी सीआयडीने 1500 पेक्षा अधिक पानांचे आरोपपत्र दाखल केले आहे. वाल्मीक कराड हाच संतोष देशमुख यांच्या हत्येतील मुख्य सूत्रधार असल्याचा दावा आरोप पत्रात केला आहे.



यासंदर्भात पंकजा मुंडे यांना प्रश्न विचारला असता त्या पत्रकारावरच संतापल्याचे दिसून आले. तुम्हाला टार्गेट दिले आहे, ते प्रश्न तुम्ही विचारत आहे. मी आता पुण्यात आहे तर मला पुण्यातील प्रश्न विचारा, असे पंकजा मुंडे म्हणाल्या.

मंत्री पंकजा मुंडे आज पुण्यात पशुसंवर्धन आयुक्तालयात एका कार्यक्रमासाठी आल्या होत्या. कार्यक्रमानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी वाल्मीक कराड याचा उल्लेख असल्याबाबत विचारले असता त्या पत्रकारांवर चिडल्या.

आरोपपत्रात काय लिहिले तुम्ही वाचले का? मी आता पुण्यामध्ये आहे. पुण्याविषयी प्रश्न विचारा, बीडविषयी नको, असे त्या म्हणाल्या.

# मुलांच्या आवडीनिवडीचे पालकांनी संगोपन करावे

### प्रसिद्ध सुलेखनकार पद्मश्री अच्युत पालव

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर दि. १ :** मुलांचे चित्र काढणे म्हणजे भिंती खराब करणे, चित्र काढून करिअर घडत नाही असा पालकांचा चित्रकलेकडे बघण्याचा मानस जोपर्यंत बदलत नाही व चित्रांची भाषा आणि पुस्तकातील भाषा यामधील फरक जेव्हा पालकांना समजेल तेव्हा समाजातील चित्रकारांचे स्थान आजच्या पेक्षा नक्कीच बदललेले असेल असे भाष्य पद्मश्री प्राप्त सुलेखनकार अच्युत पालव यांनी केले.
औचित्य होते आशय चंद्रशेखर मेश्राम यांच्या चौथ्या वर्षापासून तर 32 वर्षांपर्यंत काढलेल्या चित्रांच्या स्केच टू स्क्रीन या प्रदर्शनीच्या उद्घाटनाचे.



चिटणीस सेंटर येथे 50 व्या वर्षात पदार्पण करणाऱ्या, बालकांतील अभिरुचीला प्रोत्साहन देण्यासाठी प्रकल्प राबविणाऱ्या बसोली ग्रुप द्वारे चित्रांपासून तर ॲनिमेशन पर्यंत आपला ठसा उमटविणाऱ्या भारतातील सुप्रसिद्ध डॉक्टर चंद्रशेखर मेश्राम यांचे पुत्र आशय मेश्राम यांच्या स्केच टू स्क्रीन या चित्र प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले आहे. चित्रपटाच्या उद्घाटनाला चिटणीस सेंटरचे ट्रस्टी विलास काळे, आशय मेश्राम, उद्घाटक म्हणून अच्युत पालव व चंद्रकांत चन्ने उपस्थित होते.

याप्रसंगी पद्मश्री प्राप्त डॉ. विलास डांगरे, प्रसिद्ध न्यूरोलॉजिस्ट डॉ. चंद्रशेखर मेश्राम, सुलेखनकार अच्युत पालव, नेत्रशैल्यचिकित्सक डॉ विकास महात्मे यांना शाल, श्रीफळ, ज्ञानेश्वराची मूर्ती व आशय मेश्राम यांनी बनविलेले पेंटिंग देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. पद्मश्री पुरस्काराने सन्मानित मारुती चितमपल्ली व सुखदेव थोरात यांना त्यांचा सन्मान थेट त्यांच्यापर्यंत पोहोचता केला जाणार आहे.

अच्युत पालन पुढे म्हणाले की आज पालक आपल्या जीवनात इतके व्यस्त आहेत की मुलांना मोबाईल देऊन मोकळे होतात. रशिया सारख्या देशात मुलांना कंप्यूटर व मोबाईल पासून परावृत्त करण्यासाठी जगातील कॅलिओग्राफर ची कार्यशाळा भरविण्यात आली. असे पाऊल भारतात उचलण्याची गरज आहे. अनेक चित्रकार घडवणारे चंद्रकांत चन्ने यांनी आशय मेश्राम यांच्यामधील संशोधक वृत्ती व वेगळे काही करण्याची भूक बघितली आणि त्याच्यातील चित्रकार घडविण्याचे सत्कार्य माझ्याकडून झालं असे ते म्हणाले.

त्याच्यातील आवड त्याच्या पालकांनी जोपासली यासाठी त्यांनी त्यांच्या विशेष कौतुक केले. विद्यार्थ्यांच्या चित्रातून त्याच्या घरातून होणारे संस्कार दिसत असतात. तेव्हा तेव्हा विद्यार्थी व पालकांनाही घडविण्याचे मी काम केले आहे. यावेळी आशय मेश्राम यांनी आपल्या चित्रप्रवास रसिकां समोर उलगडला.



## पालघर जिल्ह्यात धर्मादाय रुग्णालयासाठी जमीन उपलब्ध करणार : बावनकुळे



■ **मुंबई :** पालघर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर असलेल्या आदिवासी समाजाला उत्तम आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी राज्य सरकार प्राधान्य देणार आहे. उमरोळी येथे धर्मादाय रुग्णालय आणि वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्यासाठी भाडेपट्यावर जमीन देण्यात येणार असल्याची घोषणा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली.

मुंबई येथील शारदा प्रतिष्ठानच्या वतीने डॉ. सचिन खरात यांनी उमरोळी येथे २५ हेक्टर जमीन धमार्दाय रुग्णालय आणि वैद्यकीय महाविद्यालयासाठी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाला विनंती केली होती. या संदर्भात महसूल मंत्री बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली विशेष बैठक पार पडली. बैठकीला महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव राजेश कुमार, शारदा प्रतिष्ठानचे डॉ. खरात, आमदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर, कोकण विभागीय आयुक्त विजय सुर्यवंशी, पालघर जिल्हाधिकारी गोविंद बोडखे यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभाग घेतला.

महसूल मंत्री बावनकुळे यांनी स्पष्ट केले की, पालघर जिल्ह्यातील आदिवासी नागरिकांसाठी दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी हे रुग्णालय सुरू करणे सरकारच्या प्राधान्यक्रमात आहे.

हे आरोग्य केंद्र अंत्योदय संकल्पनेशी जोडलेले असेल, म्हणजेच समाजातील शेवटच्या घटकापर्यंत आरोग्यसेवा पोहोचवण्याचा प्रयत्न केला जाईल. भविष्यात हे धर्मादाय रुग्णालय मुख्यमंत्री सहायता निधीशी जोडण्यात येईल, त्यामुळे गरजू रुग्णांना मोठ्या प्रमाणावर आर्थिक मदत मिळेल. बावनकुळे यांनी जिल्हा प्रशासनाला लवकरात लवकर जागेची पाहणी करून पुढील कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.

पालघर जिल्ह्यात आरोग्य सुविधांचा अभाव असल्याने हे नवीन धर्मादाय रुग्णालय आणि वैद्यकीय महाविद्यालय स्थानिक जनतेसाठी मोठा दिलासा ठरणार आहे.

## नंबरप्लेटवरून कोट्यवधींची लूट विभागाच्या साक्षीनेच सुरु



**मुंबई :** वाहनांची सुरक्षा आणि ओळख सुनिश्चित करण्यासाठी महाराष्ट्र राज्याने एचएसआरपी (मान्यताप्राप्त सुरक्षित असलेली नोंदणीकृत नंबर प्लेट) वापरणे अनिवार्य केले आहे. मात्र इथेही महाराष्ट्रातील नागरिकांना लुटण्याचा कार्यक्रम सुरू आहे की काय असा प्रश्न उद्भवला आहे असे म्हणत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी सरकारवर जोरदार टीका केली आहे.

जयंत पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहिले आहे. या पत्रात त्यांनी म्हटले आहे की एचएसआरपी नंबर प्लेटसाठी इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रातील नागरिकांकडून तिप्पट रक्कम वसूल केली जात असल्याचे निदर्शनास आले आहे.

महाराष्ट्र शासनाने एचएसआरपी नंबर प्लेटसाठी रॉस्मेत्रा सेफ्टी सिस्टम लि., रीअर मेझॉन इंडिया लि. आणि एफटीए एचएसआरपी सोल्यूशन्स प्रा. लि. या खासगी कंपन्यांना सहाशे कोटी रुपयांचे कंत्राट दिले आहे. मात्र या कंपन्या नंबर प्लेटसाठी इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रातील नागरिकांकडून तिप्पट रक्कम वसूल करत आहेत. विशेष म्हणजे गुजरात, गोवा, आंध्र प्रदेश, राजस्थान, केरळ या राज्यांमध्येही याच कंपन्यांना नंबरप्लेटचे काम मिळाले आहे. पण त्या राज्यांमध्ये महाराष्ट्रापेक्षा कमी दर आहेत.

ही कोट्यवधींची लूट परिवहन विभागाच्या साक्षीनेच सुरु आहे, असा थेट आरोप त्यांनी केला आहे तर या तीन खाजगी कंपन्यांना नक्की कोणाच्या पुढाकाराने महाराष्ट्रातील नागरिकांना लुटण्याचे कंत्राट दिले याची चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करावी. तसेच सदरची अवाजवी लूट रोखण्यासाठी सदरची कंत्राटे रद्द करून सामान्यांना परवडतील असे दर ठेवून नंबर प्लेट बसवण्यासाठी मुदतवाढ देण्यात यावी अशी मागणी त्यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे केली आहे.

# शरद पवारांनी पुन्हा थोपटले दंड

### पक्ष संघटना बळकट करण्यावर भर ■ प्रमुख नेत्यांवर विभागवार जिल्ह्यांची जबाबदारी

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १ :** विधानसभा निवडणूकीनंतर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला आलेली मरगळ झटकून पक्षसंघटना बळकट करण्यासाठी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी पुन्हा एकदा दंड थोपटल्याचे दिसत आहेत.

त्याच अनुषंगाने पवार यांनी पक्षाच्या बैठकीत आपल्या प्रमुख नेत्यांवर विभागवार जबाबदारी सोपवत या नेत्यांना महाराष्ट्र पिंजून काढण्याचे आदेश दिले आहेत. तसेच सरकारच्या पहिल्या १०० दिवसांच्या कार्यक्रमावर लक्ष ठेवण्यासाठी पक्षाची टास्क फोर्स तयार केली असून या टास्क फोर्सच्या माध्यमातून राज्य सरकारच्या १०० दिवसांच्या कार्यक्रमावर लक्ष ठेवण्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

यशवंतराव चव्हाण सेंटर येथे पवार यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची बैठक पार पडली. त्यामध्ये पक्षाच्या संघटनात्मक बांधणीवर चर्चा करण्यात आली. या बैठकीस राष्ट्रीय कार्याध्यक्षा खा.सुप्रिया सुळे, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्यासह सर्व आमदारांची आणि खासदारांची उपस्थिती होती.

या बैठकीत पक्ष वाढीसाठी राजेश टोपे, जयप्रकाश दांडेगावकर, शशिकांत शिंदे, जितेंद्र आव्हाड, रोहित पवार, एकनाथ खडसे, हर्षवर्धन पाटील या प्रमुख नेत्यांवर जबाबदारी दिली आहे. त्यानुसार माजी मंत्री



राजेश टोपे आणि जयप्रकाश दांडेगांवकर यांच्यावर मराठवाडा विभागाची, राजेंद्र शिंगणे आणि अनिल देशमुख यांच्यावर विदर्भ विभागाची, जितेंद्र आव्हाड आणि सुनिल भुसारा यांच्यावर कोकण विभागाची, तर हर्षवर्धन पाटील यांच्यावर पश्चिम महाराष्ट्र आणि उत्तर महाराष्ट्राची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

त्यासोबत या नेत्यांना प्रत्येक महिन्यात विभागवार जिल्ह्यांचे दौरे करून आढावा घेण्याचे आदेश दिले आहेत. तसेच पक्षसंघटनेत जास्तीत जास्त तरुण चेहऱ्याला संधी देण्याची आणि पक्षातील रिक्त पदे तात्काळ भरण्याच्या जिथे बदल करण्याची आवश्यकता असेल त्या ठिकाणचे पदाधिकारी बदलण्याच्या सुचनाही पवार यांनी या बैठकीत दिल्या

**शाडो कॅबिनेटच्या माध्यमातून काँग्रेस, उबाठाला शह देणार?**

राज्यात विरोधी पक्षनेत्याच्या पदावर ठाकरे गटाचा आमदार विराजमान होणार, तर विधान परिषदेतील विरोधी पक्षनेतेपद काँग्रेसकडे जाणार आहे. मात्र, आमदारसंख्येच्या तुलनेत राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) या पदांपासून दूर राहणार आहे. त्यामुळे पक्षाचे राजकीय अस्तित्व टिकवण्यासाठी शरद पवार यांनी नव्या रणनितीचा अवलंब करत शाडो कॅबिनेट स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाकडून स्थापन करणार असल्यामुळे महाविकास आघाडीमध्ये देखील याबद्दल दुमत निर्माण झाले आहे. शरद पवार यांच्या या खेळीमुळे ठाकरे गट आणि काँग्रेस यांना देखील शह दिला जाणार असल्याचे बोलले जात आहे.

या बैठकीबाबत माध्यमांशी बोलताना खासदार अमोल कोल्हे म्हणाले, शरद पवार यांच्या उपस्थित झालेल्या आजच्या बैठकीत सरकारच्या पहिल्या १०० दिवसांच्या कार्यक्रमावर लक्ष ठेवणारी टास्क टीम तयार करण्यात आली आहे. त्याचसोबत पक्षाच्या प्रमुख नेत्यांवर विभागनिहाय जबाबदाऱ्यांचे वाटप करण्यात आले असून ७-८ मार्चपासून या नेत्यांना विभागनिहाय दौरे करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

## ठाकरेंचा कोणता शिलेदार विरोधी पक्षनेतेपदी विराजमान?

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १ :** राज्यातील महायुती सरकारला जनतेकडून मोठे समर्थन मिळाल्यानंतर, आता ठाकरे गटासाठी विरोधी पक्षनेते पदाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे हे आगामी अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी हालचाली सुरू करत आहेत.

अर्थसंकल्पीय अधिवेशनात ठाकरे गटाकडून यासाठी जोरदार दावा होण्याची शक्यता आहे. विधानसभेतील विरोधी पक्षात सर्वाधिक संख्या ठाकरे गटाकडे असल्याने त्यांनाच हे पद मिळण्याची शक्यता आहे. यासाठी आदित्य ठाकरे, सुनील प्रभू आणि ज्येष्ठ नेते भास्कर जाधव यांची नावे चर्चेत आहेत.

पक्षाच्या बैठकीत सर्व आमदारांनी हा निर्णय उद्धव ठाकरे यांच्यावर सोपवला आहे, असे माहिती मिळत आहे. त्यामुळे ठाकरे आपल्या युवराजाला संधी देतात की एखाद्या अनुभवी नेत्याला विरोधी पक्षनेतेपदी बसवतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

शिंदे गटाने ठाकरे गटातील आमदार आणि पदाधिकाऱ्यांना आपल्या बाजूने खेचण्यासाठी ह्यऑपरेशन टायगरह्व हाती घेतल्याचे बोलले जात आहे. यामुळे ठाकरे गटाने गळती रोखण्यासाठी तत्काळ हालचाली सुरू केल्या आहेत. आगामी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरेंनी मातोश्रीवर आपल्या सर्व आमदारांची बैठक घेतली. या बैठकीत गटबंदी रोखण्यासाठी काय भूमिका घ्यावी, अधिवेशनात सरकारला कशा पद्धतीने घेरायचे, महिला सुरक्षेच्या मुद्द्यावर सरकारवर आक्रमक होण्याची रणनीती याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

या बैठकीत सर्व आमदारांनी एकमुखाने विरोधी पक्षनेतेपदाचा निर्णय घेण्याचे संपूर्ण अधिकार उद्धव ठाकरे यांना दिले. त्यामुळे आजच ठाकरे गटाकडून विधानसभाध्यक्षांना विरोधी पक्षनेतेपदासाठी अधिकृत पत्र देण्यात येणार आहे.

या महत्त्वाच्या बैठकीला विधानसभा आमदार दिलीप सोपल आणि राहुल पाटील हे वैयक्तिक कारणास्तव उपस्थित राहू शकले नाहीत. मात्र, इतर सर्व आमदार व महत्त्वाचे नेते बैठकीला हजर होते.

विरोधी पक्षनेतेपदासाठी तीन प्रमुख नावे चर्चेत असून, त्यात आदित्य ठाकरे, सुनील प्रभू, भास्कर जाधव यांचा समावेश आहे. ठाकरे गटाच्या संख्या बळाच्या जोरावर विरोधी पक्षनेते पद मिळवण्याची शक्यता जास्त आहे. उद्धव ठाकरे कोणाला संधी देतात? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## गुजरातपेक्षा महाराष्ट्रात उद्योगांना महागडी वीज

■ **महासागर प्रतिनिधी नाशिक, दि. १ :** गुजरातमध्ये उद्योगांसाठी विजेचा दर सहा रुपये ८३ पैसे प्रती युनिट, दादरा नगर हवेलीत सहा रुपये ४३ पैसे, तर छत्तीगडमध्ये सहा रुपये ७६ पैसे ते सहा रुपये ९३ पैसे यादरम्यान आहे.

महाराष्ट्रात हेच दर साडे नऊ ते साडे अकरा रुपयांच्या दरम्यान असल्याची आकडेवारी सुनावणीत मांडून उद्योजकाने महावितरणच्या वीज दरवाढीच्या प्रस्तावास विरोध केला, अन्य संघटनांनी वेगवेगळे मुद्दे मांडून दरवाढीवर हरकती नोंदविल्या.

वीज दरवाढीच्या प्रस्तावावर जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे वीज नियामक आयोगासमोर निमा, आयमा, ग्राहक पंचायत, यंत्रमागधारक आदी संघटनांनी हरकती व आक्षेप मांडून दरवाढीला विरोध केला. महावितरणच्या कार्यपद्धतीवर ताशेरे ओढले. एक ते १०० युनिट वीज वापरणाऱ्यांना योजनेचा लाभ घेण्यासाठी स्मार्ट मीटर बसविण्याची केलेली सक्ती बंद करावी, शैक्षणिक संस्थांना लागू केलेल्या वीजदरात वर्गीकरण न करता समानता राखण्याची मागणी जिल्हा ग्राहक पंचायतीचे उपाध्यक्ष सुरेश पाटील यांनी केली.

पर्यावरणस्नेही वीज प्रकल्प ग्राहकांना भेदभाव न करता सध्याच्या सुविधा वीज दरात कुठलीही नवीन तरतूद मंजूर करू नये, कृषीपंपांची मागील थकबाकी वसुलीपोटी आलेली तूट नवीन वीज दर प्रस्तावातून भरून काढण्याचा प्रस्ताव फेटाळावा, असा आग्रह ग्राहक पंचायतीचे अध्यक्ष हिराजी जाधव आणि किरण जाधव यांनी धरला.

ग्रामीण व आदिवासी भागातील ग्राहकांचे दर कमी ठेवावे. कृषी पंपांचे १०० टक्के मीटर रिडिंग घेण्यासाठी बाध्य करावे, दरवर्षी वीज दर आढावा पद्धत कायम ठेवावी, आदी मागण्याही करण्यात आल्या. यावेळी महावितरणचे अधिकारी उपस्थित होते.

## गिरणी कामगारांची फसवणूक आझाद मैदानात संताप मोर्चाचा इशारा



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १ :** मुंबईतील गिरणी कामगारांना घर देण्याच्या नावाखाली शासनाने फसवणूक केली असून, पनवेल येथील कोन गावात दिलेली घरे अत्यंत खराब स्थितीत आहेत आणि त्यासाठी अतिरिक्त शुल्काची मागणी केली जात आहे. त्यामुळे कामगारांनी ५ मार्च रोजी आझाद मैदानात संताप मोर्चा काढण्याचा इशारा दिला आहे.

मुंबई मराठी पत्रकार संघात झालेल्या पत्रकार परिषदेत गिरणी कामगार संघर्ष समितीचे अध्यक्ष गणेश सुपेकर आणि कार्याध्यक्ष डॉ. ॲड. संतोष सावंत यांनी या अन्यायाविरोधात आंदोलन करण्याचा इशारा दिला.

२०१६ मध्ये २४१७ घरांसाठी म्हाडाने लॉटरी काढली होती. अनेक गिरणी कामगारांनी २०१९ पर्यंत संपूर्ण पैसे भरले. मात्र, पाच वर्ष विलंबानंतर २०२४ मध्येच त्यांना घराचा ताबा देण्यात आला.

म्हाडाने २०२४-२५ साठी ३५११ ते ४५६० रुपये दरमहा देखभाल खर्च मागितला. गिरणी कामगारांनी यावर विरोध केल्यानंतर १ वर्षाची सूट देण्याचे आश्वासन दिले. आता म्हाडाने आपले आश्वासन मागे घेतले आहे.

या घरांचा कोविड काळात विलगीकरण केंद्र म्हणून वापर झाला. त्यानंतर अनेक घरे बंद अवस्थेत होती, त्यामुळे त्यांची मोठ्या प्रमाणात पडझड झाली आहे. लिफ्ट बंद आहेत. वीज आणि पाण्याच्या सुविधांमध्ये अडचणी आहेत. घरांच्या आतील मोडतोड झाली आहे. सार्वजनिक स्वच्छता सुविधांचा अभाव आहे.

या दुरुस्तींसाठी ५२ कोटी रुपयांचे टेंडर काढण्यात आले होते, मात्र ते पैसे नक्की कुठे गेले? असा प्रश्न गिरणी कामगारांनी उपस्थित केला आहे. या फसवणुकीविरोधात ५ मार्च रोजी आझाद मैदानावर मोठ्या आंदोलनाचे आयोजन करण्यात आले आहे. गिरणी कामगारांनी ताबा घेण्यास स्पष्ट नकार दिला आहे. शासनाने केलेला अन्याय दूर करण्यात आला नाही तर अन्यायाविरोधात तीव्र आंदोलन छेडण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

## खंडणी वसूल करण्यासाठी मुंडे यांचा आशीर्वाद

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १ :** राजकीय दबाव असल्याने ३ वेगवेगळ्या केस करण्यात आल्या होत्या. त्यात खंडणी, ॲट्रोसिटी, आणि हत्या वेगळी होती. मात्र आता तिन्ही केस एकत्र आल्याने यात मोठा राजकीय दबाव होता हे स्पष्ट होत आहे, तो धनंजय मुंडे यांचा होता, असे अंजली दमानिया यांनी म्हटले आहे.



त्या पुढे बोलताना म्हणाल्या की, मी संतोष देशमुख हत्या प्रकरणी धनंजय मुंडेंचा राजीनामा याच साठी पहिल्या दिवशीपासून मागत आहे. हे ३ प्रकरणे कधी वेगळी नव्हतीच. पहिले २९ नोव्हेंबर रोजी सुदर्शन घुलेच्या फोनवरुन वाल्मिक कराडने खंडणी मागितली गेली. त्यानंतर कंपनीच्या आवारात ६ तारखेला राडा झाला. यावेळी संतोष देशमुखमध्ये पडले आणि आरोपींवर गुन्हा दाखल झाला. पण बालाजी तांदळे नावाच्या व्यक्तीने याचा जामीन करुण घेतला. त्यानंतर ७ तारखेला वाल्मीक कराडला बोलतात की अशी लोकं जर आपल्या आड यायला लागली तर त्यांचा काटा काढायला पाहिजे. यानंतर ८ तारखेला घुले-विष्णू चाटे तिरंगा हॉटेलमध्ये भेटतात. तिथे चर्चा केली जाते की संतोष देशमुख आडवा आला तर त्याला संपवायचे ही चर्चा झाली. ही लोकं माणसं नाहीत, असे त्या म्हणाल्या.

अंजली दमानिया म्हणाल्या की, सीआयडीला जो डिजीटल पुरावा मिळाला आहे. त्यात सर्वांनी हे कृत्य होताना पाहिले आहे. हे चार्जशीटमध्ये उल्लेख करण्यात आला आहे. ही माणसं नाहीच हे क्रुरपणा आहे. ह्यांना फाशीची शिक्षा देण्यात यावी. या लोकांनी १० वर्षांमध्ये ११ गुन्हे केले असे पोलिस सांगत असले तरी मला वाटते की यांनी ११ नाहीतर २५ पटीने जास्त गुन्हे केले असतील.

बीडमधील प्रत्येक दुकानदाराकडून हे पैसे घेतले जातात. हे सर्व धनंजय मुंडे यांच्या आशीवार्दाने सुरू होते. धनंजय मुंडे यांनीच वाल्मीक कराडला वाचवण्यासाठी हे तिन्ही गुन्हे वेगवेगळे दाखल करायला लावले. धनंजय मुंडे यांचा राजीनामा अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस यांनी घेतला नाही तर संपूर्ण महाराष्ट्राने पेटून उठले पाहिजे.

## आम्ही सरसंघचालकांना फॉलो करतो...

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १ :** आम्ही सरसंघचालक मोहन भागवत यांना फॉलो करतो, ते प्रयागराजला गेले नाही म्हणून आम्हीही गेलो नाही, असा टोला ठाकरे गटाचे नेते, खासदार संजय राऊत यांनी लगावला आहे.



संजय राऊत पुढे बोलताना म्हणाले की, कुंभमेळ्याला भाजपचे मूळ प्रमुख गेले असते तर आमचे जाण्याचे ठरले होते. संघाचे इतर प्रमुख नेत्यापैकीही कुणीही जाताना दिसले नाही. म्हटले काय गडबड आहे. संघाचे कुणीच जाताना दिसले नाही. म्हणून आम्हीही गेलो नाही.

संजय राऊत म्हणाले की, आमच्यातले काही जण जाऊन गंगेत स्नान करून आले. त्यामुळे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ असेल, बजरंग दल, विश्व हिंदू परिषद असेल किंवा मग नकली हिंदुत्ववादी असलेला सध्याचा भाजपचा पक्ष असेल किंवा त्यांच्यासोबत गेले शिंदे जे ते ड्युप्लिकेट आहेत. त्यांनी आम्हाला हिंदुत्व शिकवू नये. शिंदे गटाची मती भ्रष्ट झाली आहे. हे नकली अघोरी साधू आहेत. ते अघोरी कृत्य करतायत, राजकारणात जे पापं करतायत त्यांच्यामुळे गंगेच्या किना?यावर बसलेल्या अघोरींचे नाव खराब होत आहे.

एकनाथ शिंदे यांच्या कार्यकाळात कामे झाली नाही केवळ घोटाळे झाले. त्यांच्या काळातील आरोग्यमंत्र्यांचे कमी काळात किती घोटाळे पुढे आले हे आपल्याला माहिती आहे, शिंदेंच्या काळातील घोटाळे फडणवीसांनी बाहेर आणले तर स्वागतच आहे. जे घोटाळेबाज मंत्री आहेत त्यांना पुन्हा मंत्रिमंडळात घेण्यासाठी भाजपचा विरोध होता. त्यामध्ये त्याकाळातील आरोग्यमंत्री एक आहेत, असेही राऊत म्हणाले.

## काँग्रेसच्या विधान परिषदेतील गटनेतेपदी सतेज पाटील

### अमीन पटेल विधानसभेतील उपनेते, अमित देशमुख मुख्य प्रतोद, विश्वजीत कदम सचिव

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १ :** काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी शनिवारी महाराष्ट्रातील काँग्रेस विधिमंडळ पक्ष पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या केल्या. त्यात काँग्रेस नेते सतेज उर्फ बंटी पाटील यांची विधान परिषदेतील गटनेतेपदी, तर दिवंगत माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांचे सुपुत्र अमित देशमुख यांची विधानसभेतील पक्षाच्या मुख्य प्रतोदपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

काँग्रेस सरचिटणीस के सी वेणुगोपाल यांनी काँग्रेस प्रभारी रमेश चेन्नीथला यांच्या नावे जारी केलेल्या परिपत्रकामध्ये महाराष्ट्रातील पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्यांची घोषणा केली आहे. या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या आदेशानुसार, सतेज उर्फ बंटी पाटील यांची विधान परिषदेतील गटनेतेपदी, तर आमदार



अमित देशमुख यांची विधानसभेतील पक्षाच्या मुख्य प्रतोदपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

याशिवाय अमीन पटेल यांची विधानसभेतील उपनेतेपदी, अमित देशमुख यांची मुख्य प्रतोदपदी, विश्वजीत कदम यांची सचिवपदी, शिरीषकुमार नाईक यांची प्रतोदपदी व संजय मेश्राम यांची प्रतोदपदी नियुक्ती करण्यात आली आहे. दुसरीकडे, विधान परिषदेतील मुख्य प्रतोदपदी अभिजीत वंजारी व प्रतोदपदी राजेश राठोड यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या नवनियुक्त्यांमुळे काँग्रेसने आपल्या वाटचालीसाठी तरुण नेत्यांवर विश्वास दाखवल्याचे दिसून येत आहे.

सतेज पाटील यांनी आतापर्यंत महाराष्ट्राचे गृह (शहरे), गृहनिर्माण, परिवहन, माहिती तंत्रज्ञान, संसदीय कार्य, माजी सैनिक कल्याण आदी विविध विभागांचे मंत्री व राज्यमंत्री म्हणून काम पाहिले आहे. त्यांच्या नेतृत्वात काँग्रेस नव्या दमाने विधानपरिषदेतील आपली भूमिका मांडेल असे मानले जात आहे. सतेज पाटील यांनी यापूर्वीही या वरिष्ठ सभागृहातील गटनेते म्हणून कामकाज पाहिले आहे.

उल्लेखनीय बाब म्हणजे काँग्रेसने विधानसभा निवडणुकीतील हाराकिरीनंतर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांची उचलबांगडी केली.

## उच्च शिक्षीत आदिवासी तरूण ऊसतोडणीच्या कामावर

### विशेष पदभरती घेण्यासाठी हिंगोलीत आंदोलन

■ **महासागर प्रतिनिधी, वाशिम, दि. १ :** राज्यात आदिवासी बांधवांसाठी विशेष पदभरती घेतली जात नसल्याने पदवी व पदव्युत्तर विद्यार्थी सध्या ऊसतोडीच्या कामावर जात असून हा समाजावर झालेला अन्याय आहे. शासनाने तातडीने विशेष पदभरती घ्यावी या मागणीसाठी आदिवासी युवक कल्याण संघाच्या वतीने शुक्रवारी ता. २८ हिंगोलीत जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्यात आले.



येथील जिल्हाधिकारी कार्यालसमोर आंदोलनात माजी आमदार डॉ. संतोष टारफे, माजी जिल्हा परिषद सदस्य डॉ. सतीष पाचपुते, संजय भुरके, संजय काळे, बबन डुकरे, कृष्णा पिंपरे, मारोती बेले, शंकर शेळके यांच्यासह बेरोजगार युवक व युवती सहभागी झाले होते.

राज्यात विविध विभागांमधून अनुसुचीत जमाती संवगार्तील सुमारे ५० हजार पेक्षा अधिक पदे रिक्त आहेत. काही बिगर आदिवासींनी बनावट प्रमाणापत्र काढून आदिवासी बांधवांची पदे बळकावली आहे. सदर प्रकार आदिवासी बांधवांवर अन्याय करणारा आहे. विशेष म्हणजे पद भरती नसल्यामुळे राज्यात हजारो पदवी व पदव्युत्तर झालेले बेरोजगार युवक व युवती ऊसतोडीच्या कामावर जात आहे. त्यामुळे शासनाने तातडीने पदभरती करावी अशी मागणी करण्यात आली आहे.

या शिवाय बिंदू नामावलीत अनुसुचीत जमातीवर होणारा अन्याय दूर करावा, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेमार्फत पोलिस भरती, बँकींग, राज्य लोकसेवा आयोग, केंद्रीय लोकसेवा आयोग या शैक्षणिक प्रशिक्षण दिले जाते.

मात्र याचा कालावधी सहा महिन्यावरून दिड वर्ष करावा, शासकिय आदिवासी वसतीगृहात पुर्वी प्रमाणेच भोजनाची व्यवस्था करावी यासर इतर मागण्यांबाबतचे निवेदन जिल्हा प्रशासनाकडे सादर केले आहे. राज्य शासनाने या मागण्यांबाबत तातडीने विचार करून विशेष पदभरती घ्यावी अन्यथा तिव्र आंदोलन करण्याचा इशारा यावेळी देण्यात आला आहे. आंदोलनात अनेक पालक सुद्धा सहभागी झाले होते.

## 'एचएसआरपी' नंबर प्लेट लावण्याचे दर अन्य राज्यांप्रमाणेच

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १ :** देशभरातील बहुतांश राज्यांप्रमाणेच महाराष्ट्रातही १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या वाहनांसाठी हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट बसविणे बंधनकारक करण्यात आले आहे. राज्यातील दुचाकी, तीन चाकी, चार चाकी आणि जड वाहनांसाठी एचएसआरपी लावण्याचे दर इतर राज्यांप्रमाणेच असल्याचे परिवहन विभागाने स्पष्ट केले आहे.



एचएसआरपी बसविण्यासाठी निविदा प्रक्रिया नियमांनुसार पार पडली असून, सर्वात कमी दर देणाऱ्या तीन कंपन्यांची निवड उच्चाधिकार समितीने केली आहे. या प्रक्रियेनंतर परिवहन आयुक्त कार्यालयाने संबंधित कंपन्यांना कायारंभ आदेश दिले. राज्यात लागू करण्यात आलेले दर हे 'एचएसआरपी' प्लेट आणि फिटमेंट चार्जेससह निश्चित करण्यात आले आहेत.

परिवहन विभागाच्या माहितीनुसार, अन्य राज्यांमध्ये जीएसटी वगळून एचएसआरपीचे दर पुढीलप्रमाणे आहेत. दुचाकीः 420 ते 480, तीन चाकीः 450 ते 550, चार चाकी व जड वाहनेः 690 ते 800 रूपये दुसरीकडे महाराष्ट्रातील दर दुचाकीः 450, तीन चाकी 500 आणि चार चाकी व जड वाहने 745 असे दर आहेत. या तुलनेवरून महाराष्ट्रातील दर इतर राज्यांशी सुसंगत असल्याचे स्पष्ट होते, असे परिवहन विभागाचे म्हणणे आहे.

केंद्रीय मोटार वाहन नियम १९८९ नुसार सर्व वाहनांसाठी हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट (ल्रपढ) बंधनकारक आहे. १ एप्रिल २०१९ नंतर नोंदणी झालेल्या वाहनांवर विक्रेत्यांकडून थेट एचएसआरपी बसविण्यात येते. १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या वाहनांसाठी सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ही प्लेट बसवणे अनिवार्य करण्यात आले आहे.

परिवहन विभागाने स्पष्ट केले की, काही राज्यांमध्ये एचएसआरपी दरांमध्ये फिटमेंट चार्जेस समाविष्ट नाहीत. भारतीय वाहन उद्योग संस्थेच्या अधिकृत संकेतस्थळावर सर्व राज्यांतील दरांची माहिती उपलब्ध आहे.

एचएसआरपीसाठी तिप्पट पैसे आकारले जात असल्याच्या आरोपांवर स्पष्टीकरण देताना परिवहन विभागाने सांगितले की, दर निश्चित करताना इतर राज्यांमधील दरांचा विचार करूनच निर्णय घेण्यात आला आहे. वाहनमालकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहनही करण्यात आले आहे.

# माणुसकीच्या धर्माचा जागर करणारी बिऱ्हाड परिषद..





देव, देश आणि धर्मासाठी झटणारा, स्वातंत्र्ययोद्धा आणि संस्कृती रक्षक असा ज्यांचा पूर्वेतिहास आहे, अशा भटके-विमुक्त समाज बांधवांना मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न, १९९१ मध्ये संघाच्या कार्यकर्त्यांनी केला. या भटके समाज बांधवाना यथोचित सन्मान मिळावा यासाठी पुरेपूर प्रयत्न केले जातात.
चलो जलाये दीप वहां,
जहा अभी अंधेरा है....

----------

पोटाला कोरभर तुकडा मिळविण्यासाठी दगड फोडणारे, नाचणारे गाणारे, कसरत करणारे, अर्धनग्न अवस्थेत असणारे पुरुष आणि त्यांच्या पायाला घोटणारी, खांद्यावरच्या झोळीत लटकणारी कुपोषित बालकं. नेहमीच उपेक्षित अशा या समाजाला मुख्य प्रवाहात आणणे आवश्यक आहे. या समाजाला सन्मानाचे जगणे मिळवून देण्यासाठी भटके-विमुक्त विकास परिषदेची पायाभरणी झाली.

भटके-विमुक्त विकास परिषद गेली अनेक वर्ष समाजापासून दुरावलेल्या, कधी काळी चोर लुटेरे म्हणून हिणवल्या गेलेल्या, दुखावल्या गेलेल्या, आपल्याच समाज बांधवांसाठी कार्य करीत आहे. भटके विमुक्त बांधवांची आणि त्यांच्या विकासाची कास धरलेल्या स्वयंसेवकांनी संपर्क, भेटीगाठी, भाऊबीज, अशा कार्यक्रमांमधून भटक्यांच्या पालावर राबता वाढविला आणि सेवा कार्य सुरु झाले. भटके-विमुक्त कल्याणकारी परिषदेच्या माध्यमातून भटके समाज बांधवांच्या वस्तीवर जावून त्यांच्या समस्या जाणून घेणे, त्यांना मदतीचा हात देणे, यातूनच एक भावनिक नाते दृढ होत गेले.

बंधू भाव हाच धर्म हे ब्रीद घेवून आपल्या या दुर्लक्षीत व उपेक्षीत लहान जाती समूहातील समाज बांधवाना सन्मानाचे जीवन जगता यावे यासाठी प्रयत्नरत आहे. सामान्यतः त्यांना न्याय्य हक्क मिळवून देवून मुख्य प्रवाहात आणण्याचा यशस्वी प्रयत्न भटके विमुक्त कल्याणकारी परिषदेमार्फत केला जात आहे. समाज बांधवांसाठी भटके विमुक्त कल्याणकारी परिषद एक आधारवड आहे.

विदर्भात नाथजोगी, बहुरूपी, बेलदार, पांगुळ, कैकाडी, नंदीवाले, वैदू, वडार, गोसावी, गोपाळ, मांग-गारुडी, गोंधळी, वासुदेव, ओतारी, धनगर, वंजारी, सरोदे-जोशी, नंदीबैलवाले, पारधी, सोनझारी, मसणजोगी, चित्रकती, लोहार, काशीकापडी, मसनजोगी, बंजारा समाज बांधव वास्तव्याला आहेत. त्यांच्यासाठी भटके विमुक्त कल्याणकारी परीषद, विविध उपक्रमांद्वारे कार्यरत आहे. ही परिषद शिक्षण, महिला सशक्तीकरण, स्वावलंबन (रोजगार), आरोग्य, सन्मान आणि समस्या निवारण या सहा आयामांवर कार्य करते.

२० व २१ फेब्रुवारी ला नागपूर येथील गिट्टीखदान मैदानावर भटके-विमुक्त कल्याणकारी परिषद, विदर्भ प्रांत द्वारा आयोजीत बिऱ्हाड परिषद पार पडली. या परिषदेला विदर्भातील सर्व अकरा जिल्ह्यातून भटके-विमुक्त समाज बांधवांनी ह्जेरी लावली होती. हजारोच्या संखेत एकत्र आलेल्या या एकवीस जातीच्या भटके-विमुक्त समाज बांधवांनी कार्यक्रमात प्रत्यक्ष सहभागी होवून आनंद लुटला.

वेगवेगळ्या गावागावाहून आलेले भटके समाज बांधव, ज्यांची भाषा वेगळी, राहणीमान वेगळे, व्यवसाय वेगळा असलेले जवळपास तीनशे पन्नास बिऱ्हाडे आली होती. आबाल-वृद्धांची संख्या तेराशे सत्तावीस अशी होती. परिसराला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर परिसर असे नाव देण्यात आले होते. या निमित्ताने उपस्थित सर्व भटके समाज बांधवांना अहिल्या देवी होळकर यांचे नाव महित झाले तसेच त्यांची तीनशेवी जयंती आहे हे सांगण्यात आले.

परिषदेला अखिल भारतीय घुमंतू कार्यप्रमुख दुर्गादासजी व्यास पूर्ण वेळ उपस्थित होते. एका स्वतंत्र दालनात भव्य प्रदर्शनी लावण्यात आली होती. भटक्या समाजातील तरुणांनी तयार केलेल्या ढोलताशा पथकाने मान्यवरांचे स्वागत केलं.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस, यांचे व्हिडीओद्वारा शुभेच्छा संदेश प्रसारित करण्यात आले. थोर साहित्तिक आणि भटके समाज बांधवांच्या समस्यांना वाचा फोडणारे ऋषीतुल्य व्यक्तिमत्व पद्मश्री गिरीश प्रभुणे यांनी पाठविलेल्या शुभेच्छा संदेशाचे प्रसारण झाले. कुंभमेळ्यात विदभार्चे भटक्या समाज बांधवांचे प्रतिनिधित्व करणारे योगेश्वर पुरी महाराज आणि मेहकरचे समाधान गुऱ्हाळकर महाराज यांचा सत्कार करण्यात आला.

**श्रीकांत भास्कर तिजारे**
**भंडारा. ९४२३३८३९६६**

भटकेविमुक्त समाजातीलच शिक्षित आणि होतकरू मान्यवरांसोबतच उद्योजक, इंजिनिअर, डॉक्टर, कीर्तनकार तसेच आपली कला अजूनही जोपासून ठेवलेल्या सन्माननीय व्यक्तींचा सन्मान करण्यात आला. नागपूर जिल्हाधिकारी, मनपा आयुक्त यांनी परिषदेला भेट दिली. परिषदेत विविध सत्रातून भटके समाजाच्या समस्या जाणून घेतल्या गेल्या. जातप्रमाणपत्र, घरकुल यावर सविस्तर चर्चा झाली. रात्री कलाकारांनी आपली कला सादर केली. यात बहुरूपी, गोंधळी, वडार, मसनजोगी, गोपाळ समाज बांधवांनी आपापल्या वेशभूषेत येवून मनोरंजन केले.

दुसऱ्या दिवशी ढोलताशा, संबळ, किंगरी, पुंगी अशा वाद्यांच्या गजरात शोभायात्रा काढण्यात आली. शिस्तीत निघालेली शोभायात्रा कौतुकाचा विषय ठरली.महिलांसाठी कुटुंब प्रबोधन, तर तरुणांसाठी रोजगार मार्गदर्शन महाज्योती तर्फे आयोजित केले गेले. राज्याच्या विविध मंत्र्यांसोबत समोरासमोर चर्चा करण्याची संधी अनेकांना मिळाली. परिषदेतर्फे सातत्याने सरकार दरबारी प्रयत्न करून काहींची जात प्रमाणपत्रे तयार करण्यात आली. मंत्र्यांचे हस्ते काही विद्यार्थ्यांना जात-प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

समाजबांधवांच्या साक्षीने मंत्र्यांना निवेदन देण्यात आले. भटके जाती जमातीच्या लोकांना जात व जातवैधता प्रमाणपत्र देण्याच्या अटींमध्ये शिथिलता देवून, गावकुसाबाहेर राहणाऱ्या कुटुंबाना पक्की घरे बांधून द्यावीत, अत्यावश्यक असलेली शासकीय प्रमाणपत्रे तातडीने उपलब्ध करून द्यावीत असा ठराव पारित करण्यात आला.

परिषदेत सहभागी झालेल्या प्रत्येकाला, एक शबनम/पिशवी व त्यात स्टीलचे ताट+पेला देण्यात आले. प्लास्टिकचा वापर टाळण्यात आला. नागपूर, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा सेवा विभाग आणि परिसरातील वडार वस्तीतील सर्व समाज बांधवांचे शेकडो हात या बिऱ्हाड परिषदेच्या यशस्वितेसाठी कार्यरत होते. आलेल्या मंत्र्यांनी भटके समाज बांधवांची दखल घेतलीहे या परिषदेचे फलित म्हणावे लागेल.

भटके विमुक्त कल्याणकारी परिषद, सर्वच भटके समाज बांधवांसाठी कार्य करते, सर्वांना एका छताखाली आणते हे सगळ्यांसाठीच नाविन्यपूर्ण होते. एवढ्यामोठ्या प्रमाणात हा भटका समाज बांधव शंभर दोनशे कि.मी. अंतर पार करून बिऱ्हाड परिषदेला येतो. तिथे आपल्या कुटुंबासाठी पन्नास रुपये नोंदणी शुल्क भरतो, शिस्तीत आपापली पाल टाकतो. पालावरच्या शाळेत जाणारी नीटनेटकी पोर मंत्र्यांचे स्वागत करतात, व्यासपीठावर सहज वावरणारे आपल्यातीलच कार्यकर्ते, प्रत्येक वक्त्याला शांततेने ऐकून घेणारा आणि तितक्याच आत्मीयतेने किंबहुना आक्रमकतेने आपल्या व्यथा समोर मांडणारा हा समाजबांधव. खरोखरीच अवर्णनीय आणि अकल्पनीय असेच सारे. या बिऱ्हाड परिषदे दरम्यान भटक्या समाज बांधवांनी दाखविलेली शिस्त आणि स्वच्छता कौतुकास्पद आहे. आमचे बिऱ्हाड हेच आमचे तीर्थ, हाच आमचा महाकुंभ अशी भावना काहींनी व्यक्त केली.

आम्हाला मुख्य प्रवाहात सामावून घ्यावंह्यअशी साद घालत, भटक्या समाज बांधवांची पावलं आपापल्या पालावर परतली. समाज आणि शासन यांतील दुवा म्हणून, भटके विमुक्त कल्याणकारी परिषद सकारात्मक दृष्टीकोन ठेवून कार्यरत आहे. बिऱ्हाड परिषद हे त्याच उदाहरण. माणुसकीच्या धर्माला जागवणारी ही बिऱ्हाड परिषद पंच परिवर्तनाची नांदी ठरावी.

■ ■ ■

# महाबोधी महाविहार बौद्धांच्या हवाली करा!

महाकारुणीक तथागत भगवान गौतम बुद्धांना जेथे ज्ञानप्राप्ती झाली ते बुद्धगया येथील प्राचीन महाबोधी महाविहार हे जगभरातील सर्व बौद्धांचे धार्मिकस्थान सर्वोच्च पवित्र श्रद्धास्थान आहे. ते बौद्धांच्याच ताब्यात असले पाहिजे. महाबोधी महाविहाराचे संपूर्ण व्यवस्थापन बौद्धांच्या ताब्यात देणे हा नैसर्गिक न्याय ठरेल. महाबोधी महाविहाराचा ताबा बौध्दांना मिळावा यासाठी राष्ट्रीय स्तरावर 12 फेब्रुवारीपासून देशभरातील विविध बौद्ध संघटनांचे मोठे आंदोलन सुरु आहे. भारतीय व जागतिक बौद्ध संघटना बुद्धगया महाबोधी महाविहाराजवळ बुद्धगया महाबोधी महाविहार पूर्णपणे बौद्धांना सोपवण्यासाठी निदर्शने करित आहेत.

---------------

महाबोधी महाविहाराचा ताबा बौध्दांना न मिळण्याचे सर्वात मोठे कारण म्हणजे, बुद्धगया मंदिर कायदा १९४९. या कायद्यामध्ये महाबोधी विहाराला मंदिर म्हणून उल्लेखित करण्यात आले आहे. या कायद्यात अशी तरतूद आहे की, महाबोधी महाविहाराचे संपूर्ण व्यवस्थापन पाहण्यासाठी व प्रत्येक निर्णय घेण्यासाठी नऊ सदस्यीय समिती असेल. या नऊ सदस्यापैकी पाच सदस्य हिंदू असतील व उर्वरित चार सदस्य बौद्ध असतील. या नऊ सदस्यीय समितीमध्ये एक सदस्य गया जिल्ह्याचा जिल्हादंडाधिकारी असेल व तोच या समितीचा अध्यक्ष सुद्धा असेल.

त्यापुढे जाऊन हा कायदा म्हणतो की, जर गया जिल्ह्याचा जिल्हादंडाधिकारी हा गैरहिंदू असेल तर तो या समितीचा अध्यक्ष होऊ शकणार नाही. सरकार एकूण सदस्यापैकी, अध्यक्ष म्हणून हिंदूचीच निवड करेल. त्यानंतर या कायद्यानुसार समितीची बैठक घेण्यासाठी, विहाराबाबत कोणताही निर्णय घेण्यासाठी कमीतकमी ४ सदस्य उपस्थित असणे गरजेचे आहे. समितीवर ५ सदस्य हिंदूच असतात, म्हणजे उरलेले ४ बौद्ध सदस्य नसले तरी विहाराबाबतचा प्रत्येक निर्णय घेतला जातो. हेच त्यामागचे सर्वात मोठे कारण!

या कायद्यामध्ये मध्ये ५ गैर-बौध्द सदस्यांना ठेवणे हा बौध्द धम्माचा उघड-उघड अपमानच नाही तर अन्याय देखील आहे. विशेषतः एका शैव महंत ब्राह्मणाला समितीवर ठेवणे हा बौद्ध धम्माचा अपमान आहे. कारण आदि शंकराचार्यानी बौद्धधम्माविरुद्ध हिंसाचाराची मोहीम सुरू केली होती. त्याच ब्राह्मणांना महाबोधी महाविहार ताब्यात देणे हा न्याय आहे का? जर हिंदू धर्माचे देवळातील व्यवस्थापन हिंदू धर्मिय लोकांकडे, मुस्लीमांच्या मश्चिदीचे व्यवस्थापन मुस्लीमांकडे, चर्चचे व्यवस्थापन ख्रिश्चनांकडे, गुरुद्वाराचे व्यवस्थापन शिख लोकांकडे तर बौध्दांच्या महाबोधी महाविहाराचा संपूर्ण ताबा बौध्दांकडे का नाही? संविधानातील सार्वभौम हा शब्द सर्व धर्मियासाठी लागू व्हावा.

संशोधक फ्रान्सिस बुकाननच्या कागदपत्रावरून महंत ब्राह्मणांची कोठी ही सम्राट अशोकाच्या राजवाड्यावर बांधलेली असल्याचे ऐतिहासिक पुरावे सिद्ध होतात. या जागेचे उत्खनन करून ते राष्ट्रीय वारसा घोषित करावे. खरेतर भारताची खरी ओळख सम्राट अशोक यांच्यामुळेच आहे आणि महंतांच्या हवेलीत असलेल्या शाक्यमुनी तथागत बुद्धांच्या शेकडो मूर्ती आणि शिलालेख ताबडतोब बौध्दगया येथील संग्रहालयात स्थलांतरित केले पाहिजेत, अशी सरकारकडे मागणी करण्याची गरज आहे.

महंतांच्या हवेलीत शेकडो बुद्ध मूर्ती आणि शेकडो बौद्ध राजांच्या नोंदी आहेत, हे स्वतःहून घडले का? चौथ्या शतकात आलेल्या फाड्यान आणि सातव्या शतकात आलेल्या व्हेनसांग यांच्या प्रवासवर्णनांवरून असे दिसून येते की, बौध्दगया महाबोधी महाविहारात कुठेही शिवमंदिर नव्हते.



**प्रविण बागडे**
**नागपूर.**
**9923620919**

व्हेनसांग यांच्या प्रवासवर्णनां वरून महाबोधी महाविहाराला एक दीर्घ पुरातन इतिहास असल्याचे दिसून येते. इ.स ६०० च्या दरम्यान राजा शशांकने बोधिवृक्ष व महाविहारातील बुद्ध प्रतिमा तोडण्याचा आदेश दिला. त्याने बंगाल प्रांतातील अनेक बुद्धविहार आणि स्तूप तोडून टाकले होते.

अतिशय शिताफीने कामरूपचा राजा भास्करवर्मन ने बुद्ध प्रतिमा आणि बोधिवृक्ष त्याच्या विश्वासू मंत्र्यांमार्फत वाचविले व साधारणतः इ.स. ६२० मध्ये बोधीवृक्षाभोवती २४ फूट उंचीची भिंत बांधली. तसेच इ.स. ६३७ मध्ये हुयान त्सांग ने महाबोधी महाविहाराला भेट दिली. त्याच्या लेखात आलेला प्रवेशद्वार व भव्य मंडप हा त्याकाळी ब्रह्मदेशाचा राजा साडो याने बांधला होता.

हुयान त्सांगच्या भेटीच्या आधी येथील फाल्गु (नेरंजना) नदीला पूर आला होता व त्याचे पाणी व वाळू संपूर्ण महाविहार परिसरात पसरली होती. महाविहारात अक्षरशः अडीच फूट उंच वाळू साचली होती व त्यात वज्रासन देखील दाबले गेले होते. हुयान त्सांग ने वर्णन केल्याप्रमाणे महाबोधी महाविहार १७० फूट उंच होते, बोधीवृक्षाच्या भोवती उंच भिंत होती व संपूर्ण बांधकाम प्लास्टर केलेल्या लाल रंगाच्या निळसर छटा असलेल्या विटांनी बनविले होते. महाविहाराच्या भिंतींवर अनेक ठिकाणी कोनाडे केले होते व त्यात सोन्याचा मुलामा असलेली बुद्धमूर्ती ठेवल्या होत्या. महाविहाराच्या पूर्वेला तीन मजली मंडप होता व त्याच्या आतील भिंतीवर सोन्या-चांदीने सजवलेली कलाकुसर होती. महाविहाराच्या प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूला अवलोकितेश्वर आणि मैत्रयाच्या 10 फूट उंच मूर्ती होत्या.

बुद्धांच्या बुद्धगया येथील ७ आठवड्यांच्या वास्तव्यात त्यांनी ध्यानमग्नतेत व्यतीत केलेल्या प्रत्येक ठिकाणी सम्राट अशोकाने सुंदर कोरीव स्मृतिस्थळ बांधल्या होत्या. या व्यतिरिक्त अशोकाने अनेक ठिकाणी स्तूप बांधली ज्यात सुजाताने बुद्धांना ज्याठिकाणी खीर दिली, त्यात कश्यप बंधूंनी बुद्ध-धम्माची दीक्षा घेतली व मातीपोसक जातकाचे ठिकाण सामील होते.

हे सर्व स्तूप १८ व्या शतकापर्यंत अस्तित्वात होती, नंतर महंतांच्या अलिखित सूचनेनुसार तेथील गावकऱ्यांनी हे स्तूप पोखरून तेथील विटा काढून आपली घरे बांधण्यास सुरुवात केली. कनिंघमला नंतर उत्खनन करतांना लाखेच्या अनेक मूर्ती सापडल्या. महाबोधी महाविहाराचे संवर्धनाचे काम अनेक राजांनी आणि असंख्य अनामिक दानदात्यांनी केले.

त्याकाळी महाविहार भोवती जे नक्षीदार कुंपण अशोकाने बांधले होते त्यावर अनेकांनी शिलालेख कोरून ठेवले. एका शिलालेखात एका दानदात्याने २५० दिनार (गुप्तकालीन सोन्याचे नाणे) दान दिले. त्याचबरोबर महाविहार रोज दीप पूजनाच्या तुपासाठी ३०० गाय महाविहाराला दान दिल्याचे दिसते.

तसेच ७ व्या शतकाच्या सुमारास इत्सिंगने महाबोधी महाविहास भेट दिल्याचे कळते. त्याने वर्णन केल्याप्रमाणे अनेक व्यापारी आणि राजांनी महाबोधी महाविहाराच्या स्वरंक्षण आणि संवर्धनासाठी अनेक गावे दान दिला होती. आता मात्र बीटीएमसीचे बौद्धेतर लोक विशेषतः ब्राह्मण महंत, त्यांच्या ब्राह्मण कर्मचाऱ्यांद्वारे बुद्धाच्या पाच मूर्तींना पांडव म्हणून प्रचार करत आहेत आणि पवित्र महाबोधी महाविहाराच्या व्हरांड्यात एका खोलीत शिवलिंग स्थापित करून हा आंतरराष्ट्रीय वारसा हडप करू इच्छितात.

बौध्दगया ही केवळ बिहार किंवा भारताचीच नव्हे तर जगाचीही अभिमानाची गोष्ट आहे. बौध्दगया ही जागतिक वारसा आहे. महाबोधी महाविहार मंदिर कायदा १९४९ मुळे हे पवित्र स्थान मनुवादी लोकांकडून बळकावले जात आहे. बिहारचे राज्यपाल आर्लेकर यांनीही बौध्दगया येथे येऊन महंत ब्राह्मणांच्या ताब्यातील जागा बौध्दगया शिवालय म्हणून ओळखली आहे. त्यामुळे राज्यपालपद भूषविणाऱ्या व्यक्तीला हे शोभत नाही. त्यांच्यावरही कठोर कारवाई झालीच पाहिजे.

जर बौध्दांना महाबोधी महाविहाराचा ताबा मिळवायचा असेल तर सर्वात पहिल्यांदा हा कायदा रद्द होणे गरजेचे आहे. हा कायदा रद्द करण्यात यावा यासाठी बौध्दांना आवाज उठवावा लागेल, आंदोलन करावे लागेल. महाबोधी महाविहाराला पाखंड्यांपासून मुक्त करण्यासाठी आणि महाबोधी महाविहार बौद्धांच्या स्वाधीन करण्यासाठी, देशव्यापी जेलभरो आंदोलने सुद्धा होण्याची शक्यता नाकारता येऊ शकत नाही.

म्हणून बुद्धगया महाबोधी महाविहार मंदिर कायदा १९४९ तात्काळ रद्द करावा आणि हे पवित्र बौद्ध स्थळ भारतातील बौद्धांना सोपविण्यासाठी एक नवीन कायदा करावा, अशी सर्वतोपरी मागणी उचलून धरावी लागेल. जर सरकारने मागण्या मान्य केल्या नाहीत तर देशभर तीव्र निषेध सुद्धा होऊ शकतो. भविष्यात श्रृंखलाबंद न्यायिक आंदोलनाचे स्वरुप, जाळपोट, धरणे, आंदोलने, रॅली प्रदर्शने आणि शेवटी बौध्दगया येथे लाखो लोकांचा एक मोठा मेळावा होऊ शकतो. जर कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला तर त्याची सर्वस्वी जबाबदारी सरकारची असेल.

■ ■ ■

# साल्मन.. हुवर डॅम आणि विध्वंस!

साल्मन जातीचा मासा निसगार्तल्या काही अदभुत चमत्कारांपैकी एक आहे. हा मासा नदीत जन्माला येतो, पोहत पोहत मोठा होत महासागरात पोहचतो, मग काही काळाने तीथेच सेटल होतो.

आता करिअरमध्ये पुढे काय तरं लग्न आणि अपत्य पण त्याच्या जमातीत समुद्रात राहुन अपत्य जन्माला घालतां येतं नाही. त्यासाठी हे मासे मग जिथे जन्माला आले त्या नदीत अंडी घालायला परत जातात.

नदीतुन समुद्रांत जाताना सगळा उतारचं उतार त्यामुळे समुद्रांत पोहचणे सोपे पण येतांनाचा प्रवाहाविरुद्धचा प्रवास एकदम खडतर. एक तर पाण्याचा फोर्स जास्त, त्यात परतीच्या मार्गात उंचवटे, पण प्रेम आणि संतानसुख हे त्या माशाला असला कठिण मार्ग पत्करायला प्रेरीत करते अन हजारो अडथळे पार करुन साल्मन ज्या जागेत जन्म घेतला होता त्याचं जागेत बरोबर पोहचतांत.

जन्मभुमीत असे परतातच दुसरा संघर्ष सुरु होतो तो जागेचा, अंडी घालण्याच्या सुयोग्य जागेच्या मालकीसाठी साल्मनच्या आपापसांत घनघोर लढाया होतातं त्यातं कित्येक साल्मनला जिवघेण्या जखमा होतातं. पण यथावकाश लढाया थांबतात. साल्मन अंडी घालतात, पिलं बाहेर येण्याची वाट बघतांत.

एव्हांना हजारो किलोमिटरचा प्रवास करुन आणि अटितटीच्या लढाईने साल्मन्सला विछिन्न केलेले असते. अजुन अंड्यातच असलेल्या आपल्या पिलांची वाट पहात पहात सर्व साल्मन्स मरुन जातांत. मेल्यानंतरही त्यांची विघटीत होणारी शरीरं नव्याने जन्माला येणाऱ्या पिढीच खाद्य बनतं, जिवनचक्राची पुन्हा सुरुवांत होते.

अमेरीकेच्या रॉकी माऊंटन्स मध्ये उगम पाउन पॅसिफीक सागरापर्यंत पोहचणाऱ्या कॉलोरॅडो नदीत साल्मनचे हे जिवनचक्र लाखो वर्षे अविरतं चाललेलं होतं. १९३५ च्या सुमारांस मात्र काहीतरी वेगळं झालं. सागराकडुन परतीच्या प्रवासाला निघालेल्या माशांना वाटेत एक मोठी भींत लागली.





साल्मन आपल्या उपजत बुद्धिने त्या धरणाच्या भींतीवरुन पलिकडे उड्या मारण्याचा प्रयत्न करु लागली पण इतकी मोठी उडी घेणं कोणालांच शक्य नव्हते. उड्या मारण्याच्या प्रयत्नांत अर्ध्याअधिक साल्मन्सचा बळी गेला.

हे चालु असतांना त्यातल्या काही माश्यांनी टर्बाईन्स मधुन पलिकडे जाण्याचा रस्ता शोधला. उरलेले सगळे त्यांच्या पाठोपाठ निघाले पण हाय रे दुर्दैव! टर्बाईन्सच्या पात्यांतून जातांना कित्येकांना परत आपल्या प्राणांची आहुती द्यावी लागली. एवढे होउनही काही साल्मन मात्र जन्मभुमीत पोहचलेचं. थोडीफार लढाईपण केली. आपल्या पिलांसाठी प्राणांची आहुती देउन साल्मनने आपला वंश असा चालु ठेवला.

पुढली काही वर्ष साल्मनचा पात्यात अडकुनं जीव देता देता वंश चालु ठेवण्याची धडपड चालुच होती पण नशिबाला काहीतरी दुसरेचं मंजुर होते. हुवर डॅम सारख्या धरणांची संख्या वाढायला लागली पात्यांचे अडथळे वाढायला लागले अन मग एक दिवस हताश होऊन, माणसाच्या जातीपुढे हार मान्य करुन साल्मनच्या काही जातींनी शेवटचा श्वास घेतलां. जातांना तळतळाटं होउन त्यांनी माणसाच्या जातीला कसलासा शाप दिलायं पण माणसालां तो निट ऐकु आला नाही.

१९३५ पासुन कोलेरॉडो नदीवर ५ मोठे ५ मध्यम आणि शेकडो लहान मोठी धरणं बांधली गेली आहेत. तुम्ही हे वाचेपर्यंत काही हजार माशांच्या व इतर प्राण्यांच्या प्रजाती एकट्या हुवर डॅममुळे नष्ट झाल्यात.

नदी सागराला मिळण्याची शक्यता कॉलेरॉडो नदीच्या लेखी फक्त काव्य आहे कारण लहानमोठी इतकी सारी धरणे बांधल्याने कोलेरॉडो नदी सागरापर्यंत पोहचतचं नाही. तिच्या त्रिभुज प्रदेशाचे वेगाने वाळवंटात रुपांतर होतयं. खुल्या अर्थव्यवस्थेत अमेरीकेने निसर्गाशी अशी प्रतारणा केलीये.

हुवर डॅम आजही दिमाखांत उभा आहे. त्यांतुन तयार होणारी विज आणि साठविलेले पाणी वाळवंटात उभारलेल्या लॉस वेगासच्या चमचमाटाचे मुख्य स्त्रोत आहेत. येत्या काही वर्षांत भारतात हुवर डॅम सारखे काही मोठे प्रकल्प आणि शेकडो लहान धरणे बांधण्याचे प्रस्ताव आकार घेतायेत. कित्येक धरणांवर काम देखील सुरु झालयं. तळतळाटं घ्यायला तयार असा!

■ ■ ■

# तीन वर्षात तीन वेगवेगळे इन्कमटॅक्स-कायदे कसे?

**सोप्या भाषेत इन्कमटॅक्स आणि इन्वेस्टमेन्ट**

**सीए. गोविंदप्रसाद एस. मुंदडा**
**सीए. आकाश जी. मुंदडा**
**जालना**

प्रश्न - तीन वर्षात तीन वेगवेगळे इन्कमटॅक्स कायदे लागु आहे, असे बोलचाली भाषेत म्हणतात, त्याचा नेमका जनतेसाठी काय अर्थ समजावा?

१) 31 मार्च 2025 रोजी संपणाऱ्या आर्थिक वर्षात जुना रेजीम चा इन्कमटॅक्स कायदा अनेक करदात्यांना फायदेशीर आहे अजुन ही जुन्या रेजीम मध्ये फायदा असल्याने अनेक व्यावहारिक करदाते जुनाच कायदा (रेजीम) करतांना दिसत आहे. हा जुना रेजीम म्हणजे ज्यात कलम 80 (C) चा एल.आय.सी व इतर वजावटी जसे 80(D), (मेडिक्लेम) 80 G (देणगी) वगेरे वजावटी करदात्यास अजुन ही वजावट म्हणून एकूण उत्पन्नातून करदात्यास घेता येतात. याचे सविस्तर वर्णन आपण पुढे बघणार आहोत. हा जुना कायदा आर्थिक वर्ष 2024-25 म्हणजेच करनिर्धारण वर्ष 2025-26 साठी आहे.

२) असे म्हणता येईल की अर्थसंकल्प फेब्रुवारी 2025 मध्ये अर्थमंत्र्यांनी आता नवीन आयकर मयार्दा 12 लाख पर्यंत केली आहे. मात्र जे करदाते जुन्या रेजीम मध्ये इन्कमटॅक्स रिटर्न भरतील, त्यांना या 12 लाखाचा फायदा मिळणार नाही. म्हणून ज्या करदात्यांना 12 लाखापर्यंत करमाफी चा फायदा घ्यायचा असेल त्यांना वर पॉइंट न. 1 मध्ये चर्चीलेला जुना कायदा (रेजीम) सोडुन द्यावा लागेल.

याचाच अर्थ असा की आर्थिक वर्ष 2025-26 साठी करदात्यांना 12 लाखाचा करमाफीचा रिटर्न भरणे जास्त फायद्याचे असल्यामुळे करदात्यांना जुना रेजीम सोडुन नवीन रेजीम मध्ये इन्कमटॅक्स रिटर्न भरतील. हा नवीन दुसरा कायदा (रेजीम) हा आर्थिक वर्ष 1 एप्रिल ते 31 मार्च २०२६ या वषार्साठी म्हणजेच करनिर्धारण वर्ष 2026-27 या साठी लागु राहील.

३) तिसरा कायदा पुन्हा नवीन वर्ष 2026-27 या आर्थिक वर्षापासुन लागु राहणार आहे. आता 1961 चा सुमारे 63 वषार्पूवीर्चा इन्कमटॅक्स कायदाच सरकारने पुर्ण रूपाने बदलुन टाकला आहे. या नवीन कायद्यानुसार टॅक्स इयर 1 एप्रिल 2026 पासुन इन्कमटॅक्स कायदा 2025 हा लागु राहील. याचा पहिला टॅक्स इयर (जुन्या भाषेत आर्थिक वर्ष) हा 2026-2027 असे राहील. आणि त्या नंतर येणाऱ्या सर्व वर्षासाठी नवीन इन्कमटॅक्स कायदा 2025 लागु राहणार व जुना इन्कमटॅक्स कायदा पूर्णतः संपुष्टात येणार, या मुळे येणाऱ्या तीन वेगवेगळ्या वषार्साठी तीन वेगवेगळे कायदे लागु असल्याचे म्हण्टले गेले आहे, ते बरोबरच आहे.

मात्र करदात्यांना यात संभ्रमात पडण्याचे कारण नाही. फक्त त्यांना रेजीम निवडण्याची संधी तूर्त देण्यात आली आहे, याचा सोप्या भाषेत एवढाच अर्थ समजावा.

■ ■

**अशोकायन**
**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**



## सुख - दुःख

मनरूपी महासागरात
येती चांगल्या वाईट
विचारांच्या लाटा
आपण कशावर स्वार होतो
त्यावरून ठरतो
क्रियमाण कमार्चा वाटा . .

कर्मानुसारच ठरते
आपले प्रारब्ध
त्यानुसार सुख दुःख
होते आपणा उपलब्ध ..

कृतीच्या आधी हवे
दुर्विचारावर नियंत्रण
तरच आनंदाचे डोही
तरंगेल आपले मन ..!

# अकोट येथील दर्यापूर रोड वरील ३३ के व्ही विद्युत वाहिनीचा शॉक लागून युवक ७० टक्के भाजला

■अकोट,दि.१ (प्रतिनिधी):

स्थानिक अकोट येथील शुभम श्याम नाथे वय वर्ष २३ राहणार पवार प्लॉट नंदिपेठ अकोट हा सोमवारी दिनांक २४ फेब्रु २०२५ रोजी सायंकाळी ४ वाजता च्या दरम्यान दर्यापूर रोड अकोट येथील सागर अंबडकार यांच्या शेतात मजुरीने हरबऱ्याला पाणी देण्या साठी स्प्रिंकलर उचलत असताना वरून जात असलेल्या ३३ के. व्ही पणज फिडर च्या विदयुत वहिनीला स्पर्श झाल्यामुळे माझा भाऊ शुभम श्याम नाथे हा ७० टक्के जळाला आहे.अश्या स्वरूपाची तक्रार निलेश रामदास नाथे याने विद्युत निरीक्षक, विदयुत निरीक्षक कार्यालय अकोला येथे केली वास्तविक पाहता ३३ के व्ही विद्युत वाहिनी ही जमिनी पासून १० मिटर पेक्ष्या उंच असणे आवश्यक आहे परंतु कामामधे दिरंगाई करून बडा पगार घेणारे वि .वि . कंपनीचे बेजबाबदार अभियंते मात्र शेतकऱ्यांच्या जीवाशी खेळत



आहेत. कारण विदयुत वाहिनीही जमीनी पासून १० मिटर उंच असण्याची अट असतांना सागर अंबडकार यांच्या शेतातून जाणारी ३३ के.व्ही पणज फिडर वाहिनी मात्र ही, अवघ्या ७ फूट उंचीवर असून विद्युत वाहीनी खाली लोमकळत आहे.त्यामुळेच ही अपघाताची घटना झाली. या बाबत संबधीत शेतकरी सागर अंबळकार यांच्याशी चर्चा केली असता,त्यांनी हे तार गेल्या तीन, चार महिन्या पासून खाली लोमकळत असल्याची तक्रार १०, १२ जानेवारी २०२५ रोजी पणज फिडर चे अभियंता आढे साहेब यांच्या कडे केली होती.

त्यानंतर त्या विभागाचे वायरमन गजबे यांनी स्वतः स्थळ पाहणी केली असून पण आज पर्यत कोणतीही कार्यवाही केली नाही. त्यामुळेच सदर अपघात घडला व शुभम नाथे हा ७० टक्के जळाला असून त्याची प्रकृती चिंताजनक आहे तरी वरील अधिकाऱ्याची जबाबदारी निश्चित करून संबधीत अधिकाऱ्यावर कारवाही करण्यात यावी व शुभम ला मद्दत करावी अशा आशयाची तक्रार विदयुत निरीक्षक कार्यलय अकोला येथे अपघात ग्रस्तचा भाऊ निलेश रामदास नाथे याने केली.

# गुंठेवारी नियमितीकरण प्रस्तावांना मंजुरी

## ३१ मार्च पर्यंत संधी; ३७५ प्रस्ताव प्रलंबित



■अकोला,दि.१ (प्रतिनिधी):

महानगर हद्दीत गुंठेवारी नियमितीकरणाच्या प्रस्तावांची ऑफलाइन स्वीकृती सुरू असून, ३१ मार्चपर्यंत अर्ज स्वीकारले जाणार आहेत. २८ फेब्रुवारीपर्यंत १२२५ प्रस्ताव प्राप्त झाले असून, त्यापैकी ८५० प्रस्तावांना मंजुरी मिळाली आहे. मात्र, दस्तऐवजीकरणातील त्रुटींमुळे ३७५ प्रस्ताव अद्याप प्रलंबित आहेत.

सध्या अकोला महानगरपालिकेच्या हद्दीतील ३८ टक्क्यांहून अधिक भूभाग गुंठेवारीत येतो. अशा भूखंडधारकांना मनपाच्या नगररचना विभागाकडून बांधकाम परवानगी मिळत नाही, तसेच त्यांचे मालमत्ता कार्ड (नमुना ड) राजस्व विभागाकडून दिले जात नाहीत.

त्यामुळे या भूखंडांवर बँक कर्ज मिळविणेही कठीण होते. गेल्या अनेक वर्षापासून गुंठेवारी भूखंडांचे नियमितीकरण प्रलंबित होते. मात्र, आता ही प्रक्रिया सुरूझाल्याने नागरिकांनादिलासा मिळत आहे. ३१ मार्चपर्यत अर्ज स्वीकृती गुंठेवारीच्या प्रस्तावांच्या ऑफ्फलाइन स्वीकृती मुळे काही तांत्रिक अडचणी उदभवल्या होत्या, ज्यामुळे काही प्रस्ताव रखडले. मात्र, आता ही प्रक्रिया सुरळीत सुरू असून, ३१ मार्चपर्यंत अर्ज स्वीकारले जाणार आहेत.

### इसमाची गळफास घेऊन आत्महत्या

**मूर्तिजापूर :** ५८ वर्षीय इसमाने आपल्या राहत्या घरात सोमवारी दुपारी १.३० वाजेदरम्यान गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली. प्राप्त माहितीनुसार, श्रीकृष्ण रमेश धारपवार (३८) याने दिलेल्या फिर्यादीनुसार, त्याचा घरच्या बाजूला आपल्या कुटुंबासह राहत राहत होते.

# दहावीच्या शेकडो विद्यार्थ्यांचे सेंटर अचानक बदलले

## संतप्त पालकांची मागणी जिल्हाधिकारी यांनी चौकशी करावी

■अकोला,दि.१ (प्रतिनिधी):

परीक्षा घेण्याची जबाबदारी असलेल्या शिक्षण विभागाच्या ढिसाळ कारभाराचा प्रत्यय आज दहावीच्या विद्यार्थ्यांना व पालकांना आला. ज्या शाळेत रिल व्हायरल झाली त्या शाळेतील विद्यार्थ्यांना शाळा इमारतीचा धोका असल्याचे कारण पुढे करत काहींना ज्युबिली इंग्लिश स्कुल मध्ये शिफ्ट केले. या विषयीची कुठलिही पुर्व सुचना जे विद्यार्थी परीक्षेला आले त्यांना, त्यांच्या पालकांना देण्यात आली नाही. इतकेच काय तर प्रसार माध्यमांना, वर्तमानपत्र, इलेक्ट्रानिक मिडिया यांना देण्यात आली नाही. केवळ शिक्षण विभागाच्या मनात

आले आणि त्यांनी दहावीच्या शेकडो विद्यार्थ्यांचे सेंटर अचानक बदलले. दिल्लीत प्लॅटफ्फार्म बदलल्याने जशी चेंगराचेंगरी झाली तसाच गोंधळ आज अकोल्यात परीक्षा केंद्र बदलल्याने झाला. या गोंधळास व विद्यार्थ्यांवर नाहक दबाव निर्माण करण्यास जबाबदार असलेल्या शिक्षणाधिकाऱ्यांना निलंबित करण्याची मागणी संतप्त पालकांनी केली आहे.

हा गंभीर प्रकार असून ढिसाळ नियोजनाचे उत्तम उदाहरण आज समोर आले आहे. शिक्षणाधिकारी सुचिता पाटेकर यांनी या शाळेत ४०० विद्यार्थ्यांची कॅपिसिटी होती असे सांगत विद्यार्थी वाढल्याने हा प्रकार झाला असावा याला सर्वस्वी अमरावती येथील शिक्षण विभाग जबाबदार असून कस्टोडीनला माहिती विचारा असे म्हणत त्यांनी या विषयी उत्तर देणे टाळले. आज दहावीचा इंग्लिशचा पेपर होता. जिल्हा परिषद सावित्रीबाई फ्फुले शाळेत परीक्षार्थीना पालकांना शाळेत सोडले आणि ते त्यांच्या कामाला निघुन गेले. पण, सहा रुम मधील विद्यार्थ्यांना ते आत गेल्यावर थेट त्यांचे सेंटर बदल्याचे लक्षात आले आणि धावपळ उडाली. सहा रुमच्या विद्यार्थ्यांचे सेंटर ज्युबिली शाळेत करण्यात आले. आधीच इंग्लिशचा पेपर आणि विद्यार्थी गोंधळलेले होते.

त्यात अजून गोंधळ उडवित उपस्थित पालकांना विद्यार्थ्यांना घेऊन ज्युबिली इंग्लिश स्कुल गाठावी लागली. हा सावळा गोंधळ शिक्षणाधिकारी यांच्या दूर्लक्षामुळे, ढिसाळ नियोजनामुळे झाल्याचा आरोप पालकांनी केला असून त्यांना तत्काळ निलंबित करण्याची मागणी केली आहे. या विषयीची कुठलिही पुर्व सुचना परीक्षार्थीना व पालकांबरोबर प्रसार माध्यमांना दिली नव्हती. अचानक सेंटर बदलत विद्यार्थ्यांचे व पालकांचे ताण वाढविण्याचा उद्योग शिक्षण विभागाने केला आहे.

# अकोला रेल्वे स्टेशन चौकातून चोरी गेलेला ट्रक उत्तर प्रदेशमधून जप्त



■अकोला,दि.१ (प्रतिनिधी):

रोजी ट्रान्सपोर्ट व्यावसायी प्रबजीतसिंग सहानी यानी रामदास पेठ पोलीस स्टेशनला येवुन रिपोर्ट दिला कि, त्यांचे मालकीचा ट्रक क्रमांक एमएच ३० ए.व्ही. ०६४६ हा चालक नामे शेख रियाज शेख वाहीद हयाने नेहमी प्रमाने संध्याकाळी स्टेशन परिसरातील मालधक्का परिसरात उभा केला होता त्यानंतर चालक घरी निघून गेला, दुसऱ्या दिवशी ट्रक घेण्यासाठी चालक घटनास्थळी आला असता त्याला ट्रक तेथून गायब असल्याचे दिसून आले चालकाने याची माहिती ट्रक मालकाला दिली त्यानंतर रामदास पेठ पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली, सदर ट्रक हा उत्तर प्रदेश येथे चोरून नेल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली असता पोलिसांनी आपले एक पथक उत्तर प्रदेशकडे रवाना केले उत्तर प्रदेश पोलिसां मदतीने रामदास पेठ पोलिसांनी तपास करीत सदरचा अरोपी नामे नरसिंह रामस्वरुपसिंह गुजर रा. ११५, मेकॅनिकल नगर इन्दौर यास अटक केली तसेच त्याच्या ताब्यातून चोरीस गेलेला आठ लाख रुपये किमतीचा ट्रक जप्त करण्यात आला सदरची कामगिरी जिल्हा पालिस अधीक्षक बच्चन सिह यांच्या मार्गदर्शनाखाली रामदासपेठ पोलिसांनी केली.

## थोडक्यात

### चतारी येथे गोवंश चोरीस

**पातूर :** तालुक्यांतील चांनी पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या चतारी येथिल रहिवाशी जीवन लक्ष्मण तराळे व रामदास ढोरे यांच्या घरासमोरील तिन गोवंश जातीच्या जनावरांची चक्क चारचाकी वाहनांच्या सहाय्याने चोरी झाल्याचा प्रकार घडला आहे. यामध्ये एक गाय व दोन वासरांचा समावेश आहे. चानी पोलीस स्टेशन अंतर्गत गत काही दिवसापासून या परिसरात वेगवेगळ्या प्रकारच्या चोरीच्या घटना मोठया प्रमाणात घडत असून चोर वेगवेगळी शक्कल लढवून चोरी करीत असल्याचे दिसून येत आहे. दि. २८ फेब्रुवारी रोजीच्या पूर्व रात्री अंदाजे दोन ते तीन वाजताच्या दरम्यान चतारी येथिल जीवन लक्ष्मण तराळे यांच्या घरासमोरील दोन जनावरांना चक्क चारचाकी वाहनांच्या सहाय्याने जनावरांची चोरी झाल्याचा प्रकार घडला आहे यासोबतच रामदास ढोरे यांच्या घरासमोरील एक गोरा या जनावरांची चोरी झाल्याचा प्रकार घडला आहे. दरम्यान सदरच्या घटनेचे अवलोकन केले असता परिसरात चोरांची मुजोरी वाढल्याचे चित्र दिसून येत आहे. सदरच्या घटनेची चान्नी पोलीस स्टेशनला संबंधित शेतकऱ्यांनी लेखी तक्रार दिली आहे. दरम्यान चान्नी पोलीस स्टेशनचे ठाणेदार रवींद्र लांडे यांचे मार्गदर्शनात बीट अंमलदार भगवंत शिंदे, पो. कॉ. शिवानंद स्वामी यांनी घटना स्थळाचा पंचनामा केला आहे.

### भूमी अभिलेख कार्यालयातील भूमापक गुल्हाने निलंबित

**अकोट :** तालुक्यातील बळेगाव गट नंबरम धील शेत मोजणी चुकीची केल्याप्रकरणी अकोट येथील भूमी अभिलेख कार्यालयातील भूमापक एस. व्ही. गुल्हाने यांना निलंबित करण्यात आले हे. तसेच चुकीची केलेली शेतमोजणी रद्द करण्यात आली असल्याचे पत्र अकोट येथील भूमी अभिलेख कार्यालयाचे उपअधीक्षक एस. व्ही. पालवे यांनी तक्रारदार दीपक गावंडे यांना दिले आहे. भूमापक गुल्हाने वशेतमालक विजया संदीप अठावाल यांनी चुकीची शेतमोजणी केल्याचा आरोप करीत फौजदारी कारवाई करण्याची सविस्तर तक्रार दीपक गावंडे यांनी केली होती. या तक्रारीवर ही कारवाई करण्यात आली आहे.

### आज १४ व्या दिव्यांग क्रीडा स्पर्धेचे आयोजन

**अकोला :** जिल्ह्यातील मूक व बधिर क्रीडा सांस्कृतिक मंडळ असो. च्या वतीने महानगरात १४ व्या मुकबधिर क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवारी दिनांक १ मार्च व रविवार दि २ मार्च रोजी सकाळी ९ वाजता वसंत देसाई स्टेडियम येथे दिव्यांग खेळाडूंच्या विविध क्रीड़ा स्पर्धा होणार आहेत. अकोला जिल्हा मुक बधिर क्रीड़ा संस्कृतिक मंडळ असो.च्या संयोजनाने आयोजित या १४ व्या महाराष्ट्र डेफ सेनीऑ स्पोर्ट्स चॅम्पियन शिप मध्ये जिल्ह्यातील मूक व बधिर महिला पुरुष वर्गाने मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन असो. चे चेअरमन पंकज जायले यांनी केले. या स्पर्धेच्या सफलतेसाठी असो.चे अध्यक्ष गुणवंत महल्ले, उपाध्यक्ष अश्विन कट्टा, सचिव अभय मुळे, सहसचिव प्रणय बाबर आदि मेहतन घेत आहेत.

# बारावीच्या विद्यार्थ्यांची आत्महत्या

■अकोला,दि.१ (प्रतिनिधी):

अकोल्यातील बारावीच्या विद्यार्थ्याने आत्महत्या केली आहे. वर्गमित्रासह पोलीस



उपनिरीक्षक आणि पोलीस कर्मचाऱ्यांच्या जाचाला कंटाळून त्याने मृत्यूला कवटाळल्याचा आरोप त्याच्या कुटुंबीयांनी केला आहे.अकोल्यातील प्रसन्न वानखडे या बारावीतील विद्यार्थ्याने आत्महत्या केली आहे. कुटुंबीयांच्या म्हणण्यानुसार, त्याच्या वर्गमित्रासह संबंधित पोलीस उपनिरीक्षक आणि एका पोलीस कर्मचाऱ्याच्या जाचामुळेप्रसन्नने नैराश्यातून हे टोकाचे पाऊल उचलल्याचं सांगण्यात येत आहे. दरम्यान, काही दिवसांपुर्वी या भागातील खंडणीखोर व लुटारुंच्या विरोधात स्थानिक लोकप्रतिनिधीने गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर ही आत्महत्या समोर आली असून या मागे नेमके कोण आहे असा प्रश्न उपस्थित होत आहे.अकोला शहरातीलआकाशवाणी केंद्रामागील जलाराम सोसायटीमध्ये ही घटना घडली. बुलढाण्यातील मेहकर येथील रहिवासी असलेल्या एकाविद्यार्थ्याने आत्महत्या केली आहे. मागील महिन्यात या विद्यार्थ्याचायाआणि अन्य एका विद्यार्थ्याचा वाद झाला होता. या वादानंतर प्रसन्नविरोधात सिव्हिल लाइन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. कुटुंबीयांनी केलेल्या आरोपानुसार, प्रकरणातून सुटका करण्यासाठी संबंधित पोलीस कर्मचाऱ्यानं विद्यार्थ्याकडे एक लाख रुपयांची मागणी केली होती. कुटुंबीयांनी सिव्हिल लाइन पोलिसांवर एक लाख रुपयांची मागणी केल्याचा गंभीर आरोप केला आहे. या घटनेचा पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

# तोतया पोलिस अधिकाऱ्यांनी वृद्ध महिलेला गंडविले !

■अकोला,दि.१ (प्रतिनिधी):

जुने शहर पोलिस स्टेशन हद्दीतील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५३ जवळील राधास्वामी सत्संग भवन येथील परिसरात एका ६० वर्षीय वृध्देला दोन तोतया पोलिस अधिकाऱ्यांनी गंडविल्याची घटना २६ फेब्रुवारी रोजी घडली. पोलिस असल्याची बतावणी करून त्या दोन तोतया पोलिस अधिकाऱ्यांनी वृध्द महिलेकडील सुमारे ७५ ते ८० हजार रुपयांचे सोन्याचे दागदागिने पळविल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी दोन भामट्यांविरूध्द गुन्हा दाखल केला आहे.

२६ फेब्रुवारी रोजी महाशिवरात्रीच्या दिवशी अकोल्यातील श्री राजराजेश्वर मंदिरात भक्तांची मोठी गर्दी होती ज्योती श्रीचंद रायसिंग (६०) रा. सिंधी कॅम्प, नानक नगर ही वृध्द महिला तिच्या पतीसह राधास्वामी सत्संगासाठी बाळापूर रोडवरील परिसरात गेल्या होत्या. सत्संगावरून परत येत असताना दोन तोतया पोलिस अधिकाऱ्यांनी त्यांचे वाहन थांबवून स्वतःला पोलिस अधिकारी असल्याची बतावणी करून ओळख दिली. त्या दोन तोतया पोलिस अधिकाऱ्यांनी सदर परिसरात गेल्या काही दिवसांपासून चोरीच्या घटना घडत आहेत. आम्ही पोलिस आहोत. तुम्ही सोन्याचे दागिने घालून फिरत आहात, तुमचे सोन्याचे दागदागिने काढून एका रूमालमध्ये त्यांना दिले आणि तेथून पोबारा केला. दोघेही घरी गेल्यानंतर ज्योती रायसिंग यांनी दागिने ठेवलेला रुमाल उघडला असता, त्यात सोन्याचे दागिने नसून स्टीलचे कंगन आढळले. या फसवणुकीमुळे त्यांचे अंदाजे २५ ग्रॅम वजनाचे सुमारे ७५ ते ८० हजार रूपये किंमतीचे सोन्याचे कंगन तोतया पोलिस अधिकारी असल्याची बतावणी करून पळविले आहेत. याप्रकरणी त्यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी दोन भामट्यांविरूध्द गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास जुने शहर पोलिस करीत आहेत.

# अकोला नाका, बाळापुरात चोरांचा धुमाकूळ

■बाळापुर,दि.१ (प्रतिनिधी):

अकोला नाका, बाळापूर व भिकुंड परिसरातील एका वीट भट्ट्यासह मांडवा गावात चोरांनी धुमाकूळ घालुन ६ मोबाईलसह १ लाख ५०० रुपयांचे दागिने चोरी केल्याची घटना गुरवारी मध्यरात्री नंतर म्हणजे शुक्रवार दि. २८ फेब्रुवारी रोजी २.०० वाजेपूर्वी घडली असून अज्ञात चोरा विरुद्ध बाळापूर पोलिसात दुपारी २ वाजेच्या सुमारास चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यां संदर्भात प्राप्त माहिती नुसार अंदाजे ३ ते ४ चोरांनी अकोला नाका, बाळापूर येथील कैलास शिवराम राठोड यांच्या

पानपट्टीवरून २ मोबाईल, भिकुंड परिसरातील एका वीट भट्ट्यावरून प्रमोद समाधान गवई, गौतम गोटीराम गंबादे व दत्ता किसन इंगळे या तिघांचे ३ मोबाईल त्याचं प्रमाणे मांडवा येथील आनंद अनंता शिंगोटे यांचे घरातील १ म ोबाईल असेल एकूण ६ मोबाईल किं.अं. २६ हजार ५०० रुपये, तसेच आनंद शिंगोटे यांच्याच घरातून साडेपाच ग्राम सोन्याचे दागिने किं. अं. ६७ हजार ५०० रुपयांचे सोन्याचे दागिने व ६ हजार ५०० रुपये नगदी असा एकूण १ लाख ५०० रुपयांचा मुद्देमाल चोरांनी धुमाकूळ घालुन चोरून नेला.

# अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळाचा जिल्हा महिला मेळावा

■अकोला,दि.२८ (प्रतिनिधी):

अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा महिला मंडळाचा जिल्हा मेळावा रविवार, २ मार्च रोजी दुपारी १ ते सायंकाळी ६ दरम्यान राधादेवी गोयनका महिला महाविद्यालय, मूर्तिजापूर रोड, अकोला येथे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे उद्घाटन मुख्य कार्यकारी अधिकारी बी. वैष्णवी राहणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षा डॉ. चारुशीला रुमाले प्राचार्य रा. गो. म. महाविद्यालय, प्रमुख मार्गदर्शक हभप प्रकाश महाराज वाघ प्रचार



प्रमुख गुरुकुंज आश्रम, प्रमुख अतिथी डॉ. सुचिता पाटेकर (शिक्षणाधिकारी), चित्रलेखा म्हैसने म ाजी सभापती जि.प. अकोला, नंदा आखरे, हभप उषा पखाले, उज्ज्वला देशमुख यांची राहणार आहे. यामध्ये दुपारी १ ते १.३० वाजता नाव नोंदणी व स्वागत दुपारी १.३० ते २.३० वाजता महिला भजन संमेलन दुपारी २.३० ते ३.३० वाजता उद्घाटन व सत्कार सम ारंभ तथा माय मंजुळा कार्यगौरव पुरस्कार वितरण, जिच्या हाती ज्ञानाची शिदोरी या विषयावर परिसंवाद वेळ ३.३० ते ५.०० पर्यत व्याख्याते डॉ. आशा मिरगे माजी महिला आयोग सदस्य, डॉ. हभप कल्याणी पदमने सहभागी होतील. सायं. ५ वा. सामुदायिक प्रार्थना व त्यानंतर हळदी- कुंकवाचा कार्यक्रम संपन्न होईल. सायंकाळी ६ वाजता आभार, राष्ट्रवंदना, समारोप व त्यानंतर भोजनतरीया महिला मेळाव्याला महिलांनी उपस्थित राहावे, असे आवाहन अ. भा. श्री गुरुदेव सेवा मंडळ महिला अकोला जिल्हा यांनी केले आहे.

# मनपात कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण,प्रतिबंध, मनाई आणि निवारण संदर्भात कार्यशाळा संपन्न

■अकोला,दि.२८ (प्रतिनिधी):

दि. २८ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी अकोला महानगरपालिकेच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर मुख्य सभागगृह येथे मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.सुनिल लहाने यांच्या मार्गदर्शनात अकोला महानगरपालिका, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी अकोला आणि निर्माण बहुउद्देशीय विकास संस्था (मैत्री प्रोजेक्ट) यांच्या संयुक्त विद्यमाने कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण, प्रतिबंध, मनाई आणि निवारण अधि.२०१३ अंतर्गत कार्यशाळा संपन्न झाली आहे. या कार्यशाळेचे उद्घाटन मनपा उपायुक्त धनश्री पवार यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पुजन व दीप प्रज्वलन करून करण्यात आले.

केंद्र शासनाच्या कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगीक छळापासून संरक्षण (प्रतिबंध, मनाई. निवारण) अधिनियम २०१३ अंतर्गत तरतुदी व महिला बालविकास विभागांचे शासन निर्णय दि. ११ सप्टेंबर २०१४





अन्वये अकोला जिल्हयात कार्यरत असलेली कार्यालये/आस्थापना ज्या मध्ये १० पेक्षा कमी अधिकारी/कर्मचारी असतील किंवा अधिकारी/कर्मचारी विरूध्द तक्रारी आहेत, अशा कार्यालयातील लैंगीक छळाच्या तक्रारी स्थानीक तक्रार निवारण समितीकडे करावयाच्या आहेत.

अकोला महानगराकरीता उपायुक्त प्रशासन महानगरपालिका अकोला यांना सम न्वय अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे. शासकीय/निमशासकीय व खाजगी आस्थापना मध्ये अंतर्गत तक्रार निवारण समिती स्थापन करण्याकरिता व अंतर्गत तक्रार निवारण समितीची कामकाजाची माहिती होण्याच्या दृष्टीने अकोला महानगरपालिका अधिनस्त असलेल्या अधिकारी/कर्मचा-यांकरिता सदरची कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक गिरीश पुरसदकर जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, अकोला यांनी केले, कार्यक्रमाचे संचालन शुभम झरकर यांनी केले आणि आभार प्रदर्शन शुभांगी लाहुडकर यांनी केले.

# भाषा कालप्रवाही असते : डॉ.अनिल बाभुळकर

■अकोट,दि.२८ (प्रतिनिधी):

स्थानिक श्री शिवाजी कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आकोट येथे दि. २८ फ्फ्रेब्रुवारी २०२५ रोजी मराठी विभागाच्या वतीने कवीश्रेष्ठ कुसुमाग्रज यांच्या जयंतीचे निमित्त साधून मराठी भाषा गौरव दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनील पांडे हे होते. तर प्रमुख वक्ते म्हणून प्रा. डॉ. अनिल बाभुळकर, मराठी विभाग प्रमुख, श्री नरसिंग महाविद्यालय, आकोट हे होते. याप्रसंगी आयोजक म्हणून कला शाखा व मराठी विभागप्रमुख डॉ. अशोक इंगळे, प्रा. अनिल अंबलकार यांची प्रमुख उपस्थिती होती.

मराठी भाषा गौरव दिनानिमित्त प्रमुख वक्ते म्हणून डॉ. अनिल बाभुळकर याप्रसंगी बोलताना म्हणाले की, मराठी भाषेचे स्वरूप कालानुरूप बदलत आलेले असून; जागतिकीकरणोत्तर काळात मराठी भाषेने इंग्रजी मिश्रित मराठी भाषा योजून भाषेचे एक नवे रूप धारण केलेले आहे. खरेतर, कालप्रवाही असणे हा भाषेचा मूळ स्वभाव आहे. अगदी मध्यकाल,



बहामणीकाल, शिवकाल आणि आधुनिक इंग्रंजी काळाची उदाहरणे देत त्यांनी मराठी भाषेचा गोडवा वृद्धिंगत करणारी सुरेख नमुने दाखल केली आणि आपला विषय पटवून दिला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविणारे प्राचार्य डॉ. सुनील पांडे यांनी याप्रसंगी कवी कुसुमाग्रजांच्या कवितांवर प्रकाशझोत टाकून सर्वश्रेष्ठ नाट्यकृती असणाऱ्या नटसम्राट या नाटकातील पात्रांशी समरस व्हावे असे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले. यापूर्वी एम. ए. ची विद्यार्थिनी कु. वैशाली काटे हिने कवीश्रेष्ठ कुसुमाग्रज यांच्या कवितांचे वाचन केले. तर बी. ए. भाग- २ चा विद्यार्थी अनुज सिरस्कार याने मराठी भाषा आणि कुसुमाग्रज यांच्याविषयी खूप मार्मिक मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्याचा परिचय मराठी विभाग प्रमुख डॉ. अशोक इंगळे यांनी करून दिला. कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन मराठी विभागाचे प्रा. अनंत गावंडे आणि आभारप्रदर्शन प्रा. अनिल अंबलकार यांनी सर्व उपस्थित पाहुणे व विद्यार्थी यांचे आभार व्यक्त केले. कार्यक्रमाला डॉ. संतोष वावगे, डॉ. मृणाल कडू, प्रा.सुधीर दुबे, प्रा. शिल्पा सपकाळ, प्रा. कौस्तुभ भोपळे प्रा. ऐश्वर्या चांदेकर, प्रा. प्रतिक्षा नाथे, प्रा. आरती कैथवास यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. कार्यक्रमाचा लाभ बहुसंख्य विद्यार्थ्यांनी घेतला.

# इंडियन रेड क्रॉस सोसायटी कार्यकरणी गठीत







■अकोला,दि.२८ (प्रतिनिधी):

इंडियन रेडक्रॉस सोसायटी अकोला जिल्हा शाखेची कार्यकारणी नुकतीच गठीत करण्यात आली.नुकत्याच संपन्न झालेल्या सोसायटीच्या सभेत संस्थेच्या चेअरमन पदी प्राचार्य डॉ किशोर मालोकार तर कोषाध्यक्षपदी सीए मनोज चांडक यांची निवड करण्यात आली.संस्थेचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी अजित कुंभार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत त्यांनी उपाध्यक्ष म्हणून उपसंचालक आरोग्य सेवा अकोला मंडळ यांची नियुक्ती केली.कार्यकारी समितीच्या सर्व सदस्यांच्या सहीने एक मताने नियुक्त करण्यात आलेल्या नव्या कार्यकारिणीत मानद सचिव म्हणून प्रभजीत सिंह बछेर यांची ९ व्यांदा फ्फ्रेरनिवड करण्यात आली असून व्हाईस चेअरमन म्हणून एड. महेंद्र साहू यांची नियुक्ती करण्यात आली आहे. नूतन कार्यकारणीत जिल्हा पोलीस अधीक्षक अकोला, सीईओ जिल्हा परिषद अकोला व आयुक्त अकोला मनपा यांचा विशेष आमंत्रित सदस्य म्हणून जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी फ्फ्रेरसमावेश केली. नूतन कार्यकारी समितीत एड सुभाषसिंह ठाकुर,अमर गौड.,एड.सुभाष मुंगी,अरुंधतीताई शिरसाट, प्रशांत राठी, डॉ.उज्वल कराळे,डॉ तजिन सय्यद,सूर्यकांत बुडुकले,डॉ हरमीतसिंह मल्होत्रा, राजेश देशपांडे,अकोट,कपिल रावदेव, संदेश रांदड व रामहरी डांगे यांची सर्वसंमतीने निवड करण्यात आली.एमआयडीसी अकोला येथे संस्थेला मिळालेल्या जागेत लवकरच एक अद्यावत हॉस्पिटल प्रकल्प उभारण्याच्या दृष्टीने गतिमान कार्यवाही करण्याचे संस्थेचे उद्दिष्ट असल्याचे नवनिर्वाचित मानद सचिवांनी सांगितले.

# समाजसुधारक संत वासुदेव महाराज

*जगाच्या कल्याणा संताच्या विभूती।*
*देह कष्टविती परोपकारे।।.*
संत हे जातीपाती धर्म पंथ सांप्रदायाच्या चौकटी झुगारुन देतात आणि म्हणूनच त्याचं कार्य हे विश्वव्यापी होऊन जाते. सत्य जगा समोर ठेवून मानवता धर्म वाढविण्यासाठीच संतांचे जीवन कार्य असते.ते समाज जीवनाच्या हितासाठी देह कष्टवितात. संताचं जीवन हे पमार्थिक असते. कष्ट , त्याग, संघर्ष करित परोपकारात त्याचे जीवन चंदनासम झिजवत असतात. अशा वंदनीय संत मालेत गुरुमाऊली श्री संत वासुदेव महाराज यांचे नांव श्रद्धेने घेतले जाते.

---------------

वारकरी सांप्रदायाचे अध्यर्वू थोर संत विभूती श्रध्येय संत वासुदेव महाराज असंख्य वारकरी भाविक भक्तगणांचे श्रद्धास्थान आहेत.त्यांचे जीवन अलौकिक आहे. १९१७ ते २००९ असा हा जीवन प्रवास अनेक प्रसंगांनी काठोकाठ भरलेला आहे.त्यांचा जीवनपट एखाद्या महाकाव्याचा विषय आहे.चंदनाने झिजावं अन् त्याचा सुगंध हा दाहीदिशा दरवळत रहावा असं हे पवित्र जीवन. त्यांचे पुण्यस्मरण प्रत्येकाला सत्कर्म आणि सदाचाराची प्रेरणा देत राहते.

**राष्ट्रभक्ती, देवभक्तीचा वारसा :**

इंग्रज आणि मराठा यांच्यात सिरसोली ता.आकोट येथे झालेल्या ऐतिहासिक युद्धात शौर्य गाजविणारे शूर लढवय्ये मराठा सरसेनापती हुतात्मा कर्ताजी पाटील जायले आणि सद्गुरु श्री गजानन महाराज शेगांवकर यांचे प्राणप्रिय पट्टशिष्य भास्कर महाराज या थोर महात्म्यांचे घराण्यात गुरुवर्य वासुदेव महाराजांचा जन्म झाला. देशभक्ती आणि देवभक्ती अशा दोन शक्तींनी जे घर नांदले अशा श्रीमंतीचा उज्वल वारसा महाराजांना लाभला.

त्याचे पिताश्री ह.भ.प. पुंडलिक महाराज व मातोश्री चंद्रभागादेवी हे पंढरीनाथ विठूरायांचे निस्सिम उपासक. पंढरीचे वारकरी. श्रद्धा भक्ती आणि ज्ञानाचा तथा संत विचारांचा संस्कार बालवयातच रुजला अन् अवघ्या ५ व्या वर्षी काळगव्हाण (ता.अंजनगांव सुर्जी) येथील राम मंदीरात पहिले किर्तन गुरुवर्य महाराजांनी केले. हा गंगोत्रीचा प्रवाह पुढे महासागरात विलीन होतांना लोकजीवनाला सिंचित करुन गेला.

गुरुवर्य महाराजांच्या विविधांगी जीवन कायार्तून हे संतत्व प्रखरतेने उजळून निघालं आहे. 'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती। देह कष्टविती परोपकारे।। या प्रमाणे त्यांनी आपलं जीवनभर कष्ट वेचले. मोठा संघर्ष केला. ते धर्मशास्त्राचे अभ्यासक होते. भगवद् गीता, ज्ञानेश्वरी,गाथा हे तर त्यांचे जीवन ग्रंथच. सतत वाचन मनन चिंतन करुन त्यांनी ज्ञानाची साधना केली.

संत आणि ग्रंथ
एकचि हा सुपंथ

समाज प्रबोधन हाच गुरुवर्यांच्या कायार्चा मुलाधार होता. लोक जीवनाला योग्य दिशा देण्यासाठी किर्तन, प्रवचन, संवाद आणि साहित्याच्या माध्यमातून त्यांनी समाजाला जागविले..सत्याचा सन्मार्ग दाखविला. त्यासाठी ग्रंथ विरचित केलेत. ही ग्रंथ संपदा संत साहित्याचा अमुल्य असा ठेवा आहे.

या साहित्यातूनच संताची विचारधारा व संत परंपरा ही लोकधारा झाली. संत ज्ञानदेवांची श्री ज्ञानेश्वरी आणि संत तुकोबांचा गाथा हा तर आपला धर्मग्रंथ झाला आहे. याच संत परंपरेत गुरुवर्य महाराज ग्रंथांच्या माध्यमातून आजही लोकांच्या सहृदयात अखंडपणे वसलेले आहेत.

संताची एक ओळख ग्रंथाच्या माध्यमातूनच होत असते. त्यांचे तत्वज्ञान आणि विचारधारा संत साहित्यातून प्रगट होते. यातूनच संतांचे परमदर्शन होते. विश्व कल्याणासाठी साहित्यातील शब्द न् शब्ध हे मंत्र होवून जातात. संत साहित्यात जीवन जगण्याचा मार्ग सापडतो. संतांनी धर्मशास्त्राचे नव्हे संपूर्ण ब्रम्हाडांचे ज्ञान सर्वांसाठी खुले केले आहे. सत्याचा शोध घेत जगापूढे ते मांडण्यासाठी संतांनी ग्रंथ रचियेले. त्यातूनच पाखंडांचे खंडण करण्याचा महाप्रयास केला आहे.

अज्ञान, अंधश्रद्धा आणि अंधारातून ज्ञान,श्रद्धा आणि प्रकाशाकडे लोकजीवनाची वाटचाल संतजनांनी प्रशस्त केली आहे. संत साहित्यातून ज्ञानाचे सार्वत्रिकरणाचा पाया रचला गेला आहे या संत ग्रंथावलीत गुरुमाऊली श्री संत वासुदेव महाराज यांनी ३७ ग्रंथ विरचित केलेत. संत साहित्य परंपरेत या ग्रंथांनी एक आगळे वेगळे स्थान प्राप्त केले आहे.

गुरुमाऊली महाराज हे प्रतिभावंत लोक साहित्यिक होते. त्यांचे एकेक ग्रंथ हा अभ्यासाचा विषय आहे. सत्यशोधन आणि पाखंडाचे खंडण हाच ग्रंथ रचनेचा उद्देश दिसून येतो.

गुरुमाऊली सत्यशोधक होते. या ग्रंथाचे वाचन, मनन आणि चिंतनातून गुरुमाऊलींच्या विचारधारेला उजाळा मिळतो. त्यातून श्रद्धा, भक्ती आणि ज्ञानाचा त्रिवेणी संगमात भक्तगण न्हाऊन उजळून धन्य होतात.






**नंदकिशोर हिंगणकर**
**विश्वस्त**
**श्री संत वासुदेव महाराज ज्ञानपीठ संस्था श्री क्षेत्र श्रद्धासागर**
**आकोट, जि.अकोला.**
**8767597166**

गुरुवर्य वासुदेव महाराज हे समाज जीवनाशी समरस झालेले लोक संत होते.ते समाजांचे सुख दुःख जाणत होते.दुःखी पिडीतांच्या वेदनाप्रती या संत हृदयात खोलवर संवेदना उमटत असत.

समाज जीवनात निर्माण होणारे अघटीततेची, आपत्कालाची, संकटाची ते काही घडण्यापूर्वीच जाणिव करुन देत व सवार्ना वाचवित. हा अनुभव व्यक्तीगत वा समाज पातळीवर अनेकदा आला. त्यांनी कोरोना सारख्या महामारीपासून १८ वर्षापूर्वी सावध करुन त्यावरचा उपचार सांगितला होता. हे अधोरेखित करावं असे आहे.

दुःखीताचे दुःख, पिडीतांच्या वेदना कशा कमी होतील? यासाठी महाराजांचा उपदेश घेत अनेकजन नव्हे नव्हे संपूर्ण समाज सावरल्यांचे अनेक प्रसंग सांगता येतील. गुरुवर्यांच्या विशाल अंतरंगातील करुणा ही अथांग सागराप्रमाणे होती.

दया क्षमा शांती! तेथे देवाची वसती!! या उक्ती प्रमाणे भक्ती, ज्ञान, करुणा आणि वैराग्य या संतगुणांमूळे महाराजांच्या अंतरंगात ईश्वर वसलेला होता असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. श्रद्धा भक्ती ज्ञान आणि वैराग्य यांचा त्रिवेणी संगम गुरुवर्यांनी आपल्या जीवनात साधल . अशा संतांचे जीवन आपल्याला सतत आकर्षित करीत असते. या गुरुत्वाकर्षणाने माणसाचं जीवन बदलून जाते.

जीवन हे क्षणभंगूर आहे. मृत्यू हे शाश्वत सत्य आहे. आलेल्या प्रत्येकजनाला जावं लागतंच! याची जाणिव संत करुन देत असतात . ही जाणिव अंतरंगात रुजणं आणि जीवनात आसक्त होणं हेच खरे वैराग्य आहे .

अशा वैराग्या शिवाय कुणी संत होवू शकत नाही. साधू बनू शकत नाही. एवढेच नव्हे कुणी साधकही होवू शकत नाही. गुरुमाऊली श्री संत वासुदेव महाराज वैराग्यमूर्ती होते.. त्यांच जीवन विठ्ठलमय झालं होतं.. जीवनाकडे बघण्याच्या त्यांच्या दृष्टीचा जर अभ्यास केला. चिकीत्सा केली की वैराग्य म्हणजे काय? हे कळते.

महाराजांचं वैराग्य असं उच्चत्तम होतं. ते स्वतःसाठी जगलेच नाहीत आणि म्हणूनच इच्छा मरण प्राप्त करु शकले. माझं काहीच नाही. असेल ते सद्गुरुच्या चरणी अर्पण करुन सर्वस्वाचा त्याग करणारे २१ व्या शतकातील अलिकडच्या काळातील वासुदेव महाराज एकमेवाद्वितिय संत होत.

**संत मृत्यूंवर जय मिळवितात...**

मृत्यू शाश्वत सत्य आहे. देवादिक, संतांनाही मृत्यू चुकला नाही. जन्म आणि मृत्यू यातील कालावधीला जीवन म्हटले जाते. ज्याला जीवनाचा अर्थ कळला तो मृत्यूला सहर्ष सामोरा जातो. मृत्यूची भिती त्याला वाटत नाही.

जीवन समाधानी असते. संतजनांकडे मृत्यूलाही सहजतेने स्विकारण्याची ताकद आपल्या जीवन तपश्चर्येतून प्राप्त होते. संत हे मृत्यूंवर जय मिळवित असतात. आपले जीवनाचे निहीत कर्तव्य जबाबदा-या पुर्ण होताच ते मृत्यूला जवळ करीत असतात. खरं तर संत हे इच्छा मरण स्विकारतात.

**अनेक संतजनांनी संजीवन समाधी घेतली आहे....**

संत हे त्यांचे चरित्र, सत्कार्य, विचार, त्यांची शिकवण, त्यांनी सांगितलेले तत्वज्ञानाने चिरकाल जीवंत असतात.युगानूयुगे वैचारिकदृष्ट्या समाज जीवनावर संतांचं अधिराज्य असते.

विर ओळखावा रणी।
संत ओळखावा मरणी।।

बहुजनांचे श्रद्धास्थान महावैष्णव श्रीगुरुदेव श्री संत वासुदेव महाराज यांनी इच्छा मरण घेतले असे म्हटल्या जाते.ते पंढरीचे निष्ठावंत वारकरी. पंढरीनाथांच्या दर्शनार्थ त्यांनी आजन्म आणि अखंड पंढरपूर आषाढी वारी केली.आपल्या शेवटच्या वारीत २ जुलै २००९ला आषाढ शुद्ध दशमीला रात्री ठिक ९.४५ मिनिटांनी ज्ञानराज माऊलींची आज्ञा घेवून आपला देह पंढरीनाथांच्या चरणी ठेवत ब्रम्हलीन झाले.

गुरुमाऊलींनी इच्छा मरणातून या जगाचा निरोप घेतला आहे. २जुलै २००९ ला पंढरीला आषाढी यात्रा पर्वावर पंढरीनाथाच्या चरणावर अखेरचा श्वास घेणारे एकमेवाद्वितीय संत महात्मे होत.

पुंडलिका नजिक चंद्रभागा आईच्या कुशीत ते अनंतात विलीन झाले. लाखो वैष्णव वारक-यांनी या पुण्यपवार्चे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार होऊन आषाढी एकादशीला आपल्या हृदयस्थ माऊलीला साश्रूनयनांनी अखेरचा निरोप दिला. वारकरी संतमालेत गुरुमाऊलींचे महानिर्वाण अलौकिक मानले जाते. हा प्रसंग भाविकांनी आपल्या भावविश्वात श्रद्धापूर्वक साठवून ठेवले आहे.

संतांचं जाणं जनमानसांना पोरके करुन जाते. समाजाला सतत सावली देणारा आधारवड कोसळल्याचा भास होतो. परंतू त्याचे पुण्यस्मरण ,त्यांच्या पावन स्मृती समाजाला सतत जागवित असतात. त्यांचा उपदेश आणि शिकवण सदैव सत्कर्म आणि सदाचारासाठी प्रेरणा देत असतात. म्हणूनच या गुरुमाऊलीचं पुण्यस्मरण करीत भक्तगण धन्य होतात.

श्री क्षेत्र श्रद्धासागर या पुण्यभूमीत गुरुमाऊली श्री संत वासुदेव महाराजांचा जयंती महोत्सव भक्तीमय संपन्न होत आहे.गुरुमाऊलींचे परम् दर्शनानं भक्तगण धन्य होतात. हे या ठिकाणी उल्लेखनीय ठरते. 'ऐसा संत होणे नाही' . गुरुमाऊलीच्या जयंती निमित्त त्यांचे पावन स्मृतींना भावपूर्ण श्रद्धांजली !

■ ■ ■

# पायांत घुंगरू, ओठांवर भजन!

संतश्रेष्ठ गुरुदेव रविदासजी महाराजांना मिराबाईंनी आपले गुरू मानले होते. श्रीकृष्णभक्तीत तल्लिन झालेल्या ललिता या गोपिकेचा आपण पुनर्जन्म आहोत, असे संत मिराबाईंना वाटू लागले होते. उत्तर भारतात सर्वदूर संत मिराबाई श्रीकृष्णभक्तीचा प्रसार-प्रचार करीत त्यांची भजने गात फिरल्या.

---------------



श्रीकृष्णभक्त संत मिराबाई उर्फ मीराबाई रत्नसिंह राठोड या राजस्थान मधील उच्चकुलीन हिंदु परीवारातील वैष्णव पंथातील एक महत्वाच्या संतकवयित्री होत. त्यांची श्रीकृष्णभक्ती एवढी प्रसिध्द आहे, की त्यांच्या इतके श्रीकृष्णावर प्रेम करणारे क्वचितच कुणी असेल. श्रीकृष्णावर निस्सीम प्रेम करण्याकरीताच त्यांचा जन्म झाला होता, असे म्हंटल्यास वावगे ठरणार नाही. जवळपास १२०० ते १३०० श्रीकृष्णाला उद्देशून लिहीलेल्या रचना आजही त्यांच्या भगवद्भक्तिची साक्ष देतात-

*पायो जी म्हें तो राम रतन धन पायो।*
*वस्तु अमोलक दी म्हारे सतगुरु,*
*किरपा कर अपनायो॥*
*जनम-जनम की पूँजी पाई,*
*जग में सभी खोवायो।*
*खरच न खूटै चोर न लूटै,*
*दिन-दिन बढ़त सवायो॥*
*सत की नाँव खेवटिया सतगुरु,*
*भवसागर तर आयो।*
*मीरा के प्रभु गिरिधर नागर,*
*हरख-हरख जस पायो॥*

राजस्थानमधील नागौर जिल्ह्यात कुडकी नामक गावात सुमारे १४९८ साली संतशिरोमणी मिराबाईंचा जन्म झाला. लहान वयातच मातृवियोगामुळे लहानग्या मीराजी या राव दुधाजी या त्यांच्या आजोबांच्या छत्रछायेखाली वाढल्या. त्यांचे वडील रतनसिंह हे मेडतिया जहागिरीचे राठोड होते. एकदा घरासमोरून जात असलेल्या लग्नाच्या वरातीकडे कुतूहलाने पहात मीराबाईंनी आपल्या आईला माझा वर कोण? असे विचारले असता आई तिला देवघरात घेऊन गेली व भगवान श्रीकृष्णाच्या मुर्तीकडे बोट दाखवत हा तुझा वर असे सांगितले. छोट्याशा मीराबाईंवर या गोष्टीचा एवढा प्रभाव पडला, की त्यांचे जीवनच श्रीकृष्णमय झाले. अजाणत्या वयापासुनच त्या श्रीकृष्णप्रेमात बुडाल्या. त्यांना जळी, स्थळी, काष्ठी वा पाषाणीही गोवर्धन गिरीधारी भगवान श्रीकृष्ण दिसू लागले.

*अन्न नहीं भावे नींद न आवे विरह सतावे मोय।*
*घायल ज्यूं घूमूं खड़ी रे म्हारो दर्द न जाने कोय।।*
*जो मैं ऐसा जानती रे, प्रीत कियाँ दुख होय।*
*नगर ढुंढेरौ पीटती रे, प्रीत न करियो कोय।।*
*पंथ निहारूँ डगर भुवारूँ, ऊभी मारग जोय।*
*मीरा के प्रभु कब रे मिलोगे,*
*तुम मिलयां सुख होय।।*

एका साधुकडून मिळालेली श्रीकृष्णमूर्ती संतकवयित्री मीराबाई सतत आपल्या जवळ ठेवत असत. त्यांनी त्या मूर्तीसमवेत स्वतःचे लग्न देखील लावले. श्रीकृष्णप्रेमात त्या इतक्या बुडाल्या होत्या, की जीवनातील सर्व गोष्टी त्यांना श्रीकृष्णापुढे नश्वर वाटत असत. चित्तोड येथील राणा संगा यांचे चिरंजीव भोजराज यांच्याशी संतश्रेष्ठ मिराबाईचा विवाह लहान वयातच करून देण्यात आला.

स्वतःचा विवाह श्रीकृष्णांशी झाला असल्याने त्यांना भोजराजशी झालेला विवाह मान्य नव्हता. तरी देखील कुटुंबाच्या मानमरातब- मर्यादेकरिता त्यांनी तो स्विकारला. घरात त्या श्रीकृष्णभक्तिशिवाय आणखी इतर कोणत्याही देवतेची पूजा मान्य करीत नसत.

हरि तुम हरो जन की भीर।
द्रोपदी की लाज राखी, तुम बढायो चीर॥
बूडते गजराज राखे, कियो बाहर नीर।
दासि मीरा लाल गिरिधर, दुःख जहाँ तहँ पीर॥

सन १५२७ ला झालेल्या लढाईत भोजराज मारले गेल्याने तसेच आजोबा, वडिल आणि सासरे यांचा एकामागोमाग झालेल्या मृत्यूने संत मिराबाईंनी या अशाश्वत आणि नश्वर जीवनाकडे पाठ फिरविली. आता त्यांनी श्रीकृष्णभक्तीत स्वतःला झोकून दिले होते.

या दरम्यान अनेक भजने आणि रचनांची निमीर्ती संत मिराबाईंकडुन झाली. विरह आणि विरक्तीने भरलेल्या त्यांच्या अनेक रचना आजही आपल्याला पहायला आणि ऐकायला मिळतात.

हे री मैं तो प्रेमदिवानी मेरो दरद न जाणै कोय।
*घायल की गति घायल जाणै,*
*जो कोई घायल होय।*
*दरद की मारी बन बन डोलूँ बैद मिल्या नहिं कोय।*
*मीरा की प्रभु पीर मिटेगी,*
*जद बैद सांवरिया होय।।*

सुरूवातीला संत मिराबाईंची श्रीकृष्णभक्ती ही त्यांची वैयक्तिक बाब होती; पण पुढे पुढे त्या कृष्णभक्तीत तल्लीन होत रस्त्यांवर नाचू लागल्या. ही बाब त्यांचा सावत्र दिर विक्रमादित्य याला मुळीच आवडत नसे. तो चित्तोडचा त्यावेळी नव्यानेच राजा झाला होता. त्याने संत मिराबाईंना संपविण्याचे अनेक प्रयत्न केले. प्रसादात विष कालवले, फुलांमधे साप पाठविला, बिछान्यावर खिळे रोवले... परंतु प्रत्येक संकटातून श्रीकृष्णकृपेने त्या सहीसलामत सुटून वाचत राहिल्या.

विषप्रयोग केलेल्या दुधाचा नैवैद्य ज्यावेळी त्यांनी श्रीकृष्णाला दाखवला आणि प्रसाद म्हणून ते दूध ग्रहण केले, त्यावेळी श्रीकृष्णाची मूर्ती विषामुळे हिरवी झाली. परंतु संत मिराबाईंना काहीही बाधा झाली नाही. हे पाहून त्यांना खुप वाईट वाटले. त्यांनी भगवान श्रीकृष्णाला पूर्ववत होण्यास प्रार्थना केली. भगवान पूर्ववत मूर्ती रूपात प्रकट झाले. त्यांचे प्रसिद्ध भजन-

*पग घूँघरू बाँध मीरा नाची रे!*
*मैं तो मेरे नारायण की*
*आपहि हो गई दासी रे!!*
*लोग कहै मीरा भई बावरी*
*न्यात कहै कुलनासी रे!*
*विष का प्याला राणाजी भेज्या*
*पीवत मीरा हाँसी रे!!*
*मीरा के प्रभु गिरिधर नागर*
*सहज मिले अविनासी रे!!*

संतश्रेष्ठ गुरुदेव रविदासजी महाराजांना मिराबाईंनी आपले गुरू मानले होते. श्रीकृष्णभक्तीत तल्लिन झालेल्या ललिता या गोपिकेचा आपण पुनर्जन्म आहोत, असे संत मिराबाईंना वाटू लागले होते. उत्तर भारतात सर्वदूर संत मिराबाई श्रीकृष्णभक्तीचा प्रसार-प्रचार करीत त्यांची भजने गात फिरल्या. १५३८च्या सुमारास त्या वृंदावनात आल्या असाव्यात, असा अनेक अभ्यासकांचा अंदाज आहे.

आपल्या आयुष्यातील शेवटच्या वर्षांत त्या द्वारका येथे वास्तव्यास होत्या. येथेच श्रीकृष्णाच्या चरणी त्या कायमच्या लीन झाल्या. गोवर्धन गिरीधारी गोपाळ श्रीकृष्णाच्या मूर्तीत त्या २ मार्च १५६८ रोजी लुप्त झाल्या, असे सुद्धा अनेक इतिहास अभ्यासक सांगतात. स्मृतिदिनी त्यांना व त्यांच्या अजरामर ईशभक्तीला दंडवत प्रणाम !!

---------------

**बापू उर्फ श्रीकृष्णदास निरंकारी.**
**गडचिरोली.**
**७७७५०४१०८६.**

■ ■ ■

# जीवनाचा अक्षांश रेखांश...

साधारणत% ती गोष्ट १९५४- ५५ ची असावी. तसे पाहिले तर आमचे गाव हे फारच छोटे आणि आड मार्गावर असलेले होते. गावात येण्यासाठी बस गाड्या तर नव्हत्या. तालुक्याचे ठिकाणावरून गावात येण्यासाठी एक तर सायकल नाहीतर पैदल वारी करावी लागत होती. तिही कच्च्या रोडनी.

अशातच आमच्या गावात एका शिक्षकाची नियुक्ती झाली. गावात राहण्यासाठी पक्के घर नसल्यामुळे त्यांनी आम्हाला राहण्यासाठी जागा मागितली. आमचे घर छोटे होते तेव्हा आम्ही म्हशी, गाईच्या गोठ्यामागे लागून असलेली जागा गुरुजींना दिली. अत्यंत सडपातळ बांधणी छोटीशी उंची असलेले ते शिक्षक होते. साधे भोळे, इमानदार व सत्यवादी होते.

अंगात पैजामा, नेहरू शर्ट आणि डोक्यावर असलेली गांधी टोपी ही त्यांना शोभून दिसत होती. शिवाय गुरुजीचे लग्नही झालेले होते. त्यामुळे ते आपली पत्नी घेऊन आमच्याकडे राहायला आले होते. त्यातच त्यांना तीन बाळे झालेत एक मुलगी आणि दोन मुले. गुरुजीचे वडील आणि आई हे त्यांच्या बालपणातच मरण पावली होती. ते चौथा वर्गात असताना त्यांच्या आईचा मृत्यू झाला, तर गुरुजी सातवीत असताना त्यांच्या वडील स्वातंत्र्यलढ्याच काळात टायफाईड सारख्या शुल्लक बिमारीने मरण पावले.

त्यांच्या आई-वडिलांना ते एकटे होते. त्यांच्यापेक्षा मोठ्या दोन बहिणी होत्या. स्वातंत्र्य चळवळीच्या काळात कपड्याच्या मिल नेहमी बंद राहत असल्यामुळे त्यांची बहीण ज्यांना दिली होती तिथे दारिद्र्य आणि उपासमारीमुळे तिचा मृत्यू झाला. मग दुसऱ्या मुलीलाही त्यांनाच दिले कारण एका बाळाने जन्म घेतला होता. तिचाही त्याच कारणांनी मृत्यू झाला.

असे हे ऐकुलते एक राहिलेले वंशज म्हणजे गुरुजी. आमच्या गावात आले तेव्हा ते बी.ए, डी.एड होऊन प्राथमिक शिक्षक लागलेले होते. येथेच त्यांनी आमच्या घरी राहून स्वतःचे पोस्ट ग्रॅज्युएशन म्हणजे एम ए मराठी मध्ये पूर्ण केले. सकाळी शाळेत शिकवायचे आणि रात्री अभ्यास करायचा ही त्यांची दिनचर्या होती. त्यांच्यासोबत मी ही दहावीत असल्याने रात्री अकरा वाजेपर्यंत अभ्यास करायचो काही अडले तर गुरुजी रात्री शिकवत सुद्धा होते. त्यामुळे माझे हळूहळू सर्वच विषय पक्के होऊ लागले.

रात्री अकराला झोपल्यानंतर ते नित्य क्रमाने सकाळी पाच वाजताच मला हाक मारून उठत होते. हात पाय धुवून मी अभ्यासाला बसत होतो. अशी त्यांची कडक शिस्त होती जी हळूहळू माज्या अंगवळणी पडली होती. लवकरच दहावीच्या परीक्षा तोंडावर आल्या. गावावरून परीक्षा केंद्र दूर तालुक्याच्या ठिकाणी होते. रोजचे जाणे येणे जमत नसल्याने आम्ही तालुक्याच्या ठिकाणी महिनाभरासाठी एक खोली भाड्याने घेतली. तिथेच राहून मी अभ्यास करीत होतो.

मला स्वयंपाक करून खाऊ घालण्यासाठी माझी आई सोबत होतीच. दहावीचे पेपर ठीकठाक जाऊ लागले. त्या दिवशी शेवटचा पेपर म्हणजे भूगोलाचा पेपर होता. काही केल्या अक्षांश रेखांश पाठ करूनही विसरून जात होते म्हणून एका लहानग्या चिठ्ठीवर मी अक्षांश रेखांश लिहून घेतले होते. त्या दिवशी त्याच गुरुजींचा वर्गावर नंबर लागला.

मला वाटले गुरुजी मला काही म्हणणार नाही. मी अक्षांश रेखांश पेपरमध्ये लिहिण्यासाठी चिठ्ठी काढली. ते त्यांनी अचूकपणे हेरले होते. क्षणाचाही विलंब न करता ते माज्याजवळ पोहोचले. माज्या जवळची छोटीशी सुट्टी घेऊन गेलेत. त्या वेळेस त्यांनी मला काही म्हटले नाही.

पेपर संपल्यानंतर ते माझ्यासोबत माझ्या रूमवर आले आणि तिथे त्यांनी आईच्या समोर माज्या दोन्ही गालावर चपराक दिली होती. माझे दोन्ही गाल लालबुंद झाले आणि ते म्हणाले,' मी इतकी तुझ्यावर मेहनत करतोय तू काय करत आहेस हे तुला शोभते काय? आणि माझ्या आईला सांगू लागले की हा पेपर मध्ये कॉपी करत होता.'

त्या वरती माझी आई काहीच नाही बोलली. नंतर मी पाया पडून त्यांची माफी मागितली आणि यापुढे कधीही कॉपी करणार नाही असे वचन दिले त्यानंतर ते शांत झाले. पाणी पिऊन घराकडे जाण्याच्या तयारीला ते लागले. त्या वेळेस माझ्या आईने त्यांना म्हटले,'बापू जेवण करून जा' ते जेवण करून गेले.

वास्तविक पाहता ते आमच्या घरी म्हणजे गोठ्यात राहत होते. त्यांच्याकडून कोणतेही भाडे आम्ही घेत नव्हतो. त्यांची मुले तिथेच मोठी झाली. त्यांच्या आंघोळी पांगोळी माझी आईच करून देत होती. माझ्या आईच्या अंगावर ती मुले सारखी खेळत होती.

मला त्या माराचा आजही अनुभव येतो. त्यात त्यांचे प्रेम दडलेले होते. त्यांना वाटत होते की, मी ही मोठा होऊन चांगला व्यक्ती व्हावा. माज्या पेक्षाही मोठा अधिकारी व्हावे, परंतु सत्याचा मार्ग कधीही सोडू नये ही त्यांची अभिलाषा होती. घरची परिस्थिती नाजूक होती. गावात मिळते तेवढे शिक्षण मी घेतले. पुढे आमचा घरगुती व्यवसाय म्हणजे शेती करण्यासाठी वडिलांना हातभार लावत होतो.

तितक्यातच गुरुजींनी आपले शिक्षण वाढविल्यामुळे ते तालूक्यात गेले. बीएड करण्यासाठी जिल्ह्यात गेले. तिथून ते अल्पावधीतच माध्यमिक शिक्षक झाले. अकरावी मॅट्रिकचा पॅटर्न बदलल्या नंतर ज्युनिअर कॉलेज पॅटर्न जेव्हा आला तेव्हा ते ज्युनिअर लेक्चरर झाले. म्हणून दुसऱ्या गावाला गेलेत.

पाहता पाहता त्यांच्याशी असलेला माझा संबंध दूर सरत गेला परंतु जेव्हा वेळ मिळेल तेव्हा मी त्यांची आठवण करत होतो. वेळप्रसंगी जवळच असल्यामुळे भेटायलाही जात होतो. मी माझा शेतीचा व्यवसाय करीत असताना गावातील राजकारणामध्ये प्रवेश केला. अनेक वेळा मला निवडून येणेही जमले. कधी सरपंच तर कधी उपसरपंच कधी सदस्य म्हणून मी गावामध्ये नामलौकिक मिळवला. गावासाठी जमेल त्या योजना तालुक्यावरून खेचून आणत होतो. गावाचा विकास हेच माझे ध्येय होते.

त्यांच्यासारखा मी मोठा शिक्षक होऊ शकलो नाही परंतु गाव शिक्षक मात्र जरूर झालो. नागरिकशास्त्रातील प्रत्यक्ष लोकशाही त्यांनी जरी शिकवली असली पण प्रत्यक्षात मी अमंलात आणली होती. गाव प्रमुख असल्यामुळे माझा संबंध तालुक्यातील नेत्यांसोबत, पंचायत समितीतील नेत्यांसोबत आणि परिसरातील आमदार, खासदारांसोबत येऊ लागला. मी राजकारणामध्ये वाढलो तसे गुरुजींना कधीही जमले नाही आणि त्यांनी कधी मी नेता व्हावे ही अपेक्षाही केली नाही.

त्यांचा माझ्याकडे पाहण्याचा अक्षांश रेखांश एक चांगला व्यक्ती व्हावा आणि नोकरी लागून घराची उन्नती करावी हाच होता परंतु माझ्यातील सुप्त गुण मला झोपू देत नव्हता. त्यांनी शिकवलेला इतिहास, भूगोल, नागरिकशास्त्र मराठी इत्यादी विषयाचा वापर करून मी अनेक प्रसंगी भाषणे दिलेत. ती भाषणे लोकांना खुप आवडायचे. त्यात दिलेले उदाहरणे लोकांना आवडायचे.

हे सर्व शक्य झाले केवळ गुरुजीमुळेच. ते नसते तर माझ्यातील राजकारणी कधी घडला नसता. त्यांनी शिकवलेला सत्याचा मार्ग मी कधीही राजकारणात शिरून सोडला नाही. इमानदारीने माझ्याकडून जितकं होते तितके मी करत गेलो होतो.

साधारणतः २० वर्षांपूर्वी त्यांचा एक मुलगा शासकीय कागदपत्रे करण्यासाठी गावात आला. त्यावेळी तो मला भेटला मी त्याही वेळेस ग्रामपंचायत सदस्य पदावर होतो. माझ्याकडून जितके जमले तितकी मी त्यांना मदत केली. कितीही म्हटले तरी तो माझा भाचाच होता. पण त्याची जात वेगळी आणि माझी जात वेगळी होती. परंतु आमची नाळ मात्र एकमेकाशी जोडली होती ती माणुसकीच्या जातीने.

गुरुजी सेवानिवृत्त झाले शहरात घर बांधून राहत होते. जेव्हा मी त्या गावाला जात होतो तेव्हा त्यांची न चुकता भेट घेत होतो. परवा अचानक मी त्या गावाला गेलो ते एका कार्यक्रमामुळे. तिथे विचारले की गुरुजी कसे काय आहेत? तेव्हा समोरच्या माझ्या मित्रांनी उत्तर दिले तुला माहित नाही का रे, 'गुरुजी मागच्या वर्षीच मरण पावले.

मला फार दुःख झाले. मी लगेच त्यांच्या मुलाचा फोन नंबर मागितला आणि बोलू लागलो. आज माझे वय ७१ वर्षाचे आहे. बोलत असताना मला सहाजिकच धापा लागत होत्या. आवाजातील तो कणखरपणा पूर्णपणे निघून गेला होता. गुरुजीच्या आठवणी डोळ्यांमध्ये चित्रपटासारख्या समोर येत होत्या. डोळ्यातून नकळत अश्रू ही गळत होते.

त्यांच्या आणि माझ्या जीवनातील प्रसंग मी त्यांच्या मुलासमोर कथन करीत होतो. तेव्हा गालावरची वरखडे आपोआप उमटली. अचानक म्हटले हात आणि पाय थरथर कापायला लागले. मन भरून आले होते. थंड पाणी पिऊनही वारंवार तहान लागत होती. छाती दाटून येतच होती. त्यांना वारंवार पाहण्याची इच्छा होत होती परंतु माझ्यासमोर नाईाज होता.

मी त्यांच्या मुलावर रागावलो. अरे बाबा गेले तर मला कळवलं सुद्धा नाही. त्याच्याजवळ सुद्धा माझा नंबर नव्हता. शिवाय तो खूपच लहान होता त्यावेळी. त्याला हे काहीच माहित नव्हते फक्त मामा म्हणून तो मला ओळखत होता. माझ्या गोष्टी ऐकून तोही गहिवरला होता.

गुरुजीचा आणि माझा अक्षांश भलेही वेगळा होता ते पूर्वेला तर मी पश्चिमेकडे होतो. ते उत्तरेकडे तर मी दक्षिणेकडे होतो. परंतु एकाच बिंदूतून ते अक्षांश रेखांश निघत असल्यामुळे कुठेतरी आमचे मूळ एकच होते. सर्वच नाते काही जातीसाठी जपायचे नसतात. काही प्रेमाचे आदराचे आणि जीवनाला मार्ग दाखवणाऱ्याचे असतात. ते आयुष्यभर कधी विसरत नाहीत आणि विसरूही नाही. जीवनाला मार्ग दाखवणारा गुरु हा कधीही श्रेष्ठच आता फक्त त्यांच्या स्मृती आहेत.

माझी ही परिस्थिती ताकुमाकू गुरुजीची ही परिस्थिती फारशी सुदृढ झालेली नाही एक सत्यवादी, इमानदार व्यक्तीचे आयुष्यात फार तर एक छोटेशे घर एका मुलीचे लग्न त्या शिवाय काय करू शकतो. दोन्ही मुलांना त्यांनी आपल्यासारखे शिक्षक करून ते कृतार्थ आयुष्य जगले आणि गेले. ते मला न भेटताच त्याचे फार वाईट वाटते.

---------------

**सुहास लुतडे**
**वरोरा, जि. चंद्रपूर.**

■ ■

# अंतरमनातील कृष्णविवर'

## आत्मशोध आणि ब्रह्मांडीय सत्याचा शोध

विजयकुमार राऊत लिखित 'अंतरमनातील कृष्णविवर' ही मराठी साहित्याच्या वैचारिक परंपरेतील एक महत्त्वपूर्ण आणि प्रेरणादायी कलाकृती आहे.

या पुस्तकात लेखकाने मानवता, जीवन, अस्तित्व आणि ब्रह्मांडाच्या रहस्यांवर चिंतन केले आहे.

**कृष्णविवरः एक रूपकात्मक संकल्पना**

'कृष्णविवर' (ब्लॅक होल) ही एक खगोलीय संकल्पना आहे, जी अत्यंत गूढ आणि रहस्यमय मानली जाते. विजयकुमार राऊत यांनी या संकल्पनेचा उपयोग मानवी मनाच्या गूढतेला समजावून सांगण्यासाठी केला आहे.

जसे कृष्णविवर प्रकाशाला आपल्याकडे खेचते आणि आतल्या गूढतेत सामावून घेतो, तसेच मानवी मनही विचारांच्या, भावना आणि अस्तित्वाच्या गूढतेत हरवून जाते.

**पुस्तकाची मध्यवर्ती थीम**

हे पुस्तक जीवनाच्या संघर्षांवर, प्रेमाच्या विविध पैलूंवर आणि आत्मशोधाच्या प्रवासावर प्रकाश टाकते. लेखकाने भौतिकशास्त्र, तत्वज्ञान आणि मानवी जीवनाचा सखोल अभ्यास करून या कथेत विविध घटक मिसळले आहेत. त्यातून वाचकांना स्वतःच्या अंतरंगात डोकावण्याची संधी मिळते.

**लेखनशैली आणि प्रभाव**

विजयकुमार राऊत यांच्या लेखनशैलीत गहन तत्त्वज्ञान, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि भावनिक संवेदनशीलता आढळते. हे पुस्तक वाचकांना केवळ कल्पनाशक्तीच्या प्रवासावर नेत नाही, तर त्यांना स्वतःच्या अस्तित्वाचा पुनर्विचार करण्यास भाग पाडते.

**का वाचावे 'अंतरमनातील कृष्णविवर'?**

आत्मचिंतन आणि तत्त्वचिंतनः जीवनाचे गूढ आणि अस्तित्वाच्या प्रश्नांचा विचार करायला लावते.

विज्ञान आणि साहित्य यांचा संगमः खगोलशास्त्र आणि मनोविज्ञान यांचा सुंदर मिलाफ आहे.

वाचकाला अंतर्मुख करणारे विचारः हे पुस्तक वाचकाच्या मानसिक आणि भावनिक प्रवासाला चालना देते.



**निष्कर्ष**

'अंतरमनातील कृष्णविवर' हे केवळ एक साहित्यकृती नसून, आत्मशोध आणि ब्रह्मांडाच्या रहस्यांचा अन्वेषण करणारा अनुभव आहे. हे पुस्तक वाचकाला स्वतःच्या मनातील कृष्णविवरात डोकावून पाहण्याची प्रेरणा देते. मानवतेच्या आणि ब्रह्मांडाच्या अद्भुत प्रवासाचा शोध घ्यायचा असेल, तर हे पुस्तक नक्की वाचावे!

---------

**विजयकुमार राऊत**
**साई कॉलनी हिंगणा रोड, नागपूर.**
**7249776462**

■ ■

## संतोष देशमुख हत्या प्रकरण
# दोघांना वगळले

■ **वृत्तसंस्था, बीड, दि. १ :**
मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणी सीआयडीने आरोपपत्र दाखल केले असून या प्रकरणात धनंजच मुंडे यांचा निकटवर्तीय वाल्मिक कराड हाच मास्टरमाइंड असल्याचा दावा केला आहे. १५०० हून अधिक पानांच्या या आरोपपत्रात संतोष देशमुख हत्याकांडची सविस्तर माहिती देण्यात आलेल आहे. परंतु, सीआयडीने या प्रकरणातून दोघांना वगळण्यात आले आहे. सिद्धार्थ सोनावणे आणि रणजित मुळे या दोघांची नावे आरोपपत्रात टाकण्यात आलेली नाही.

संतोष देशमुख हत्या आणि खंडणी प्रकरणात सीआयडीने १५०० हून अधिक पानांचे आरोपपत्र दाखल केले आहे. त्यात वाल्मीक कराड हाच देशमुख यांच्या हत्येचा मुख्य सूत्रधार असल्याचा दावा करण्यात आला आहे. ५ गोपनीय साक्षीदारांच्या जबाबातून ही माहिती समोर आली असून, संतोष देशमुख आडवा आला, तर त्याला कायमचा धडा शिकवा, असा मेसेज वाल्मीक कराडने विष्णू चाटेमार्फत सुदर्शन घुलेला दिला होता, हे आरोपपत्रात नमूद करण्यात आले आहे. यामुळे वाल्मीक कराडचा पाय पुरता खोलात गेल्याचे मानले जात आहे. मात्र, या आरोपपत्रातून सिद्धार्थ सोनावणे आणि रणजित मुळे यांची नावे वगळण्यात आली आहेत.

सीआयडीने संतोष देशमुख हत्या, दोन कोटीचे खंडणी प्रकरण आणि अॅट्रोसिटी अशा तीन प्रकरणाचा एकत्रित तपास करून हे आरोपपत्र दाखल केले आहे. सिद्धार्थ सोनावणे हा हत्येच्या आरोपातील आरोपी होता. तर रणजित मुळे हा ?ट्रोसिटीच्या प्रकरणात आरोपी होता. या दोघांनाही या प्रकरणातून वगळण्यात आले आहे. त्यांच्या विरोधात कोणतेही पुरावे सापडले नसल्यामुळे आरोपपत्रात त्याचे नाव टाकण्यात आलेले नसल्याची माहिती आहे.

वाल्मीक कराड, सुदर्शन घुले, विष्णू चाटे, सुधीर सांगळे, प्रतिक घुले, महेश केदार, सिद्धार्थ सोनवणे व जयराम चाटे हे आरोपी अटकेत आहेत. त्यांच्या विरोधात दोषारोपपत्र दाखल आहे. तर, कृष्णा आंधळे हा अद्यापही फरार आहे.

# पेट्रोल पंप उभारणीसाठी प्रत्येक जिल्ह्यात एक खिडकी योजना

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १ :**
राज्यातील १६६० पेट्रोल पंपांच्या परवानग्या जलदगतीने देण्यासाठी प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयात ह्यएक खिडकीह्व प्रणाली सुरू करण्याचा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महसूल विभागाला या योजनेच्या अंमलबजावणीसाठी स्पष्ट निर्देश दिले असून, या माध्यमातून राज्यात मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती होणार आहे. एका अहवालानुसार सुमारे ३०,००० नवीन रोजगार निर्माण होऊ शकतात. महसूल मंत्री बावनकुळे म्हणाले,

पेट्रोल पंप सुरू करण्याची प्रक्रिया पुढील तीन महिन्यांत पूर्ण व्हावी, यासाठी परवानगी देताना अत्यावश्यक व कमीत कमी अटी-शर्ती ठेवण्याबाबत आदर्श कार्यप्रणाली महसूल विभागाने तयार करावी, तसेच, विभागीय आयुक्तांनी यासंदर्भात तातडीने सूचना पाठवाव्यात, असेही त्यांनी सांगितले.

**२ हजार नवीन पेट्रोल पंपांचे नियोजन**

राज्यात दोन हजार नवीन पेट्रोल पंप उभारण्याचे नियोजन असून, यासाठी इंधन कंपन्यांना महसूल विभागाकडून आवश्यक असलेल्या विविध परवानग्या जलदगतीने मिळाव्यात यासाठी एक खिडकी योजना कार्यान्वित केली जात आहे.

महसूल विभागाकडून एनओसी, पोलीस विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग आदींच्या विविध परवानग्या मिळण्याच्या प्रक्रियेत अडथळे येत होते. त्यामुळे ही प्रक्रिया सुलभ करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात एक खिडकी सुरू करण्यात येणार आहे, असे



महसूल मंत्री बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

**रोजगार आणि गुंतवणुकीला चालना**

केंद्र सरकारने १६६० पेट्रोल पंप मंजूर केले असून, हे पंप सुरू झाल्यानंतर सुमारे ३०,००० तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. तसेच, राज्यात साडेतीन ते चार हजार कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित आहे.

रोजगार निर्मिती आणि गुंतवणुकीला चालना देण्यासाठी ह्यएक खिडकी योजनाह्व सुरू करण्याचा निर्णय घेतल्याचे मंत्री बावनकुळे यांनी सांगितले.

यावेळी इंधन कंपन्यांच्या अडचणी व समस्यांचा आढावा घेण्यात आला. महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव राजेश कुमार, सहसचिव अजित देशमुख, बीपीसीएलचे सुंदर राघवन, राज्य प्रमुख राकेश सिन्हा, मुख्यमंत्र्यांचे सल्लागार डॉ. आनंद बंग, समन्वयक संतोष निरेंदकर, एचपीसीएलचे बी. अच्युत कुमार, मुकुंद जवंजाळ आदी या बैठकीला उपस्थित होते.

**एक खिडकीमुळे प्रक्रिया सुलभ**

पेट्रोल पंप उभारणीसाठी लागणाऱ्या परवानग्यांची प्रक्रिया पूर्वी क्लिष्ट व वेळखाऊ होती. मात्र, एक खिडकी योजना लागू झाल्यास जिल्हास्तरावरच सर्व परवानग्या एका ठिकाणी मिळू शकतील, त्यामुळे प्रक्रिया जलदगतीने पार पडेल. तसेच, यामुळे लघु उद्योजक आणि व्यावसायिकांना व्यवसाय विस्ताराच्या संधी उपलब्ध होतील.

या निर्णयामुळे उद्योजक, इंधन व्यवसायिक आणि तरुणांना मोठ्या प्रमाणावर लाभ होणार असून, महाराष्ट्रातील पायाभूत सुविधांच्या विकासालाही चालना मिळणार आहे

## नाट्यप्रेमींसाठी सुवर्णसंधी

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १ :**
बृहन्मुंबई महानगरपालिका, क्रीडा भवन प्रस्तुत मॅकबेथ या नाटकाचा प्रयोग मंगळवार ४ मार्च रोजी सायंकाळी ४ वाजता अण्णाभाऊ साठे सभागृह, भायखळा येथे आयोजित करण्यात आला आहे.

त्याचप्रमाणे बुधवार ५ मार्च रोजी सायंकाळी ७ वाजता साहित्य संघ, गिरगावच्या सभागृहात या नाटकाचा प्रयोग होणर आहे. लेखक आर. एल. तुली व अशोक ग्रोव्हर तसेच अरुण कदम यांनी दिग्दर्शीत केलेल्या एक अजरामर शेक्सपियरियन कलाकृती थेट रंगमंचावर सादर केली जाणार आहे. तिकीट व अधिक माहितीसाठी विद्याधर नामपल्ली (८८२८५४३६९९) यांचेशी संपर्क साधता येईल .रंगभूमीप्रेमींनी चुकवू नये अशी अनोखी संधी असून, मुंबईकरांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## वेगवेगळ्या अपघातात ३ जणांचा मृत्यू

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. १ :**
पुणे शहरात विविध तीन अपघात घटनेत ज्येष्ठ नागरिकासह तीन जणांचा मृत्यू झालो. पुणे-सोलापूर रस्त्यावरील हडपसर भागात एसटीच्या धडकेत पादचाऱ्याचा मृत्यू झाल्याची घटना घडली. काळूराम नंदकुमार जाधव (५०), रा. भेकराईनगर, फुरसुंगी, हडपसर असे मृतकाचे नाव आहे. बसचालक मिलिंद तुकाराम कांबळे याला अटक करण्यात आली. जाधव हे पुणे-सोलापूर रस्त्यावरील रामटेकडी परिसरातून निघाले होते. त्यावेळी उड्डाणपुलावर भरधाव एसटी बसने जाधव यांना धडक दिली.

दुसऱ्या घटनेत पुणे ते नगर रस्त्यावर लोणीकंद परिसरात भरधाव वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला. रमेश राजेंद्र गायकवाड (४२), रा. वाडेगाव, ता. शिरुर, जि. पुणे असे मृतकाचे नाव आहे.

तिसऱ्या घटनेत मुंबई-बंगळुरू बाह्यवळण मार्गावरील नवले पुल परिसरात भरधाव वाहनाच्या धडकेत जगजीवन कोरंगा शेट्टी (७४), रा. श्री हरिकृपा, कोरग्रावाडी, जि. उडपी, कर्नाटक असे मृत ज्येष्ठ नागरिकाचे नाव आहे. बेबी जगजीवन शेट्टी यांनी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

# कोरटकरच्या पत्नीची पोलिसांत तक्रार

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १ :**
कोल्हापूर आणि नागपुरात दाखल गुन्ह्यातून सध्या फरार असलेला तथाकथित पत्रकार प्रशांत कोरटकर याच्या पत्नीने बेलतरोडी पोलीस ठाण्यात लेखी तक्रार दिली. धमक्या येत असून कुटुंबीयांना काही झाल्यास इतिहास अभ्यासक इंद्रजीत सावंत जबाबदार असतील, अशी भूमिका त्यांनी पोलिसांसमोर मांडली.

छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्याविषयी आक्षेपार्ह बोलल्याचा आरोप असलेल्या कोरटकर याच्याविरुद्ध कोल्हापूर पोलिसांमध्ये गुन्हा दाखल झाला. आता नागपूर पोलिसांनीही गुन्हा दाखल केल्यामुळे कोरटकरच्या अडचणींत वाढ झाली आहे. कोरटकर सध्या फरार असून त्याच्या घराला बेलतरोडी पोलिसांनी सुरक्षा पुरवली आहे. कोरटकरविरुद्ध कारवाईचा फास आवळत असल्यामुळे कोरटकरची पत्नी पल्लवी कोरटकर या शनिवारी दुपारी १२ वाजता बेलतरोडी पोलीस ठाण्यात पोहचल्या. त्यांनी बेलतरोडी पोलिसांमध्ये लेखी तक्रार देत असल्याचे सांगितले. त्यानंतर बेलतरोडीचे ठाणेदार मुकुंद कवाडे यांनी महिला पोलीस अधिकाऱ्यांना पल्लवी कोरटकर यांची तक्रार घेण्याचे आदेश दिले.

त्यांनी दुपारी दीड वाजेपर्यंत बेलतरोडी पोलिसांत लेखी तक्रार देऊन चर्चा केली. त्यानंतर मात्र, त्या पोलीस ठाण्यातून कुणाशीही न बोलता निघून गेल्या.



आतापर्यंत कोरटकरने मी धमकी दिलीच नाही, माझा आवाज मॉर्फ केल्याचा दावा केला होता. मात्र, आता कोल्हापूर पोलिसांनी सीडीआर आणि लोकेशन प्राप्त केल्यामुळे तो फोन कोरटकरनेच केला होता, हे स्पष्ट झाले आहे.

# अनैतिक संबंधाच्या संशयातून पत्नीचा गळा चिरला

मुलांनाही जखमी केले

स्वतः केला आत्महत्येचा प्रयत्न

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १ :**
शेजारी राहणाऱ्या युवकाशी पत्नीचे अनैतिक संबंध असल्याच्या संशयातून पतीने पत्नीचा चाकूने गळा चिरला. मुलगा वाचविण्यासाठी धावला असता त्याच्यावरही चाकूने हल्ला केला आणि स्वतःच्या गळ्यावर चाकूने वार करीत आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. या हल्ल्यात जखमी महिलेवर रुग्णालयात उपचार सुरु होते. त्या महिलेचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. पिंकी नांदूरकर (३२), बगडगंज, असे मृत महिलेचे नाव आहे तर रवी नांदूरकर असे आरोपी पतीचे नाव आहे.

नंदनवन परिसरात रवीचा वाहनांना कुशन लावण्याचा व्यवसाय आहे. पत्नी पिंकी आणि दोन मुलांसह तो राहतो. गेल्या काही दिवसांपासून तो तणावात होता. पत्नीचे शेजारी राहणाऱ्या युवकासोबत अनैतिक संबंध आहेत, असा त्याला संशय होता. त्यामुळे तो कट रचत होता.

त्याने गांधीबागमधून गेल्या आठ दिवसांपूर्वी चाकू विकत घेतला. त्याला पत्नी व मुलांना संपवायचे होते. त्यानंतर स्वतःही आत्महत्या करायची होती. रविवारी रात्री पत्नी व मुलांसह त्याने जेवण केले आणि सर्व जण झोपी गेले.

पहाटे ५ वाजताच्या सुमारास रवी झोपेतून उठला. त्याने उशीखाली लपवून ठेवलेला चाकू काढला आणि पत्नीच्या गळ्यावरुन फिरवला. या हल्ल्यामुळे पत्नी मोठ्याने ओरडली. तर बाजूला झोपलेले ११ आणि १३ वर्षांची दोन्ही मुले झोपेतून उठली. त्यानंतर रवीने मोठ्या मुलावरही चाकूने हल्ला करण्याचा प्रयत्न केला. मात्र, मुलाने वार चुकवला. चाकू मुलाच्या बोटाला लागल्याने त्याची दोन बोटे कापल्या गेली.

लहान मुलाने आरडाओरड करीत शेजाऱ्यांना आवाज दिला. शेजारी धावतच घरात आले. त्यावेळी पिंकी रक्ताच्या थारोळ्यात पडलेली होती तर मोठा मुलगाही जखमी अवस्थेत होता.

दरम्यान, रवीने स्वतःचाही गळा चिरून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. शेजाऱ्यांनी पोलिसांना फोन लावला आणि रवीला पकडून ठेवले. पोलिसांनी लगेच जखमी पिंकी, रवी आणि मुलाला मेडिकल रुग्णालयात दाखल केले. त्यांच्यावर उपचार सुरु असून पिंकी यांची प्रकृती चिंताजनक होती. पिंकीचा शुक्रवारी सायंकाळी मृत्यू झाला. या प्रकरणी नंदनवन पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

दरम्यान, पत्नीचे अनैतिक संबंध असल्याचा संशय होता. पत्नी आपल्याला दगा देत असल्याची भावना मनात होती. त्यामुळे पत्नी व मुलांना संपवून टाकल्यानंतर स्वतःही आत्महत्या करणार होतो. मी पत्नी व मुलांचा खून करणार होतो. झोपेत असलेल्या पत्नीचा गळा चिरला आणि एका मुलावरही हल्ला केला. मात्र, ते दोघेही थोडक्यात वाचले, अशी धक्कादायक माहिती एका युवकाने पोलिसांना दिली.


